


संचालकांकडून प्रतिज्ञा घेताना

## वार्षिक वृत्त

राष्ट्रीय शके १९४०-४१ (सन २०१८-१९)


# स्त्री शक्ती प्रबोधन
## (ग्रामीण)



कातकरी वस्तीवरील दल



स्वावलंबी गाव प्रकल्पातील फिल्टर वाटप



युवतींच्या मदतीने ग्रंथालय सुरु



डेली कलेक्शन मधून छोट्या उद्योजकांना अर्थसहाय्य



टेलीमेडीसीन प्रकल्पांतर्गत तपासणी करताना



एकल महिलांसाठी माहेरघर

# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

**राष्ट्रीय सौर शके १९४०-४१ (सन २०१८-१९)**

## अनुक्रमणिका


- ♦ **मनोगत**

वृत्त

**१. किशोरी विकास**

**२. युवती विकास**

**३. बालवाडी**

**४. नव चैतन्य गट**

**५. हिरकणी**

**६. महिला विकास**

६.१ बचत गट

६.२ स्वयंरोजगार

६.३ आरोग्य

६.४ नेतृत्वविकसन

✻ **विविध प्रकल्प**

✻ **स्फुट**

✻ **विशेष लेख**

१. एकल महिला प्रकल्प

२. महिलांचे व्यक्तिमत्त्व विकसन आणि नेतृत्त्वविकसन


## ♦ मनोगत ♦

स्त्री शक्ती प्रबोधन ही ज्ञान प्रबोधिनीची कार्यदिशा! त्यातील बचत गटातून सुरू झालेल्या या ग्रामीण कामाचे २०१८-१९ हे २४ वे वर्ष! आणि त्यासाठी वेगळा, 'स्त्री शक्ती प्रबोधन, ग्रामीण' या नावाने स्वतंत्र विभाग केल्याचे हे सातवे वर्ष. सुरुवाती-सुरुवातीला केवळ कर्जासाठी सहभागी होणारा महिलांचा गट आता आपणहून, स्वयंप्रेरणेने निर्णयकर्ता बनला आहे.

स्त्री शक्ती प्रबोधनाच्या कामामध्ये पहिल्यांदा स्त्रीचा आत्मसन्मान वाढणे, मग त्यातून सक्षमीकरण होऊन कौटुंबिक वातावरण सुधारणे आणि मग तिच्यातील नेतृत्वगुण विकसित होऊन राष्ट्रीय विकासात तिचा सहभाग वाढवणे असे विकासाचे टप्पे प्रबोधिनीत सांगितले आहेत. या चारही टप्प्यांवर ग्रामीण भागात काम चालू आहे असे आता निश्चित म्हणता येईल.

एखादी महिला केवळ आर्थिक गरज भागविण्यासाठी जरी बचत गटात आली तरी एकदा का ती गटात आली की तिथलीच होते. प्रबोधिनीच्या गटाच्या चोख व्यवहारामुळे तिची आर्थिक गरज भागते, तिला आर्थिक फायदा व्हायला लागतो, मग हळूहळू तिच्या कुटुंबाला बचत गटाचा फायदा कळायला लागतो. तिला कुटुंबातून पाठिंबा मिळू लागतो. तिचा आत्मसन्मान वाढीस लागतो. पूर्वी गटाच्या कामासाठी घरातून बाहेर पडताना घरच्यांना विचारून बाहेर पडणारी ती, मग 'सांगून' बाहेर पडायला लागते. पूर्वी गटाच्या बैठकीच्या दिवशीच अचानक घरी येणारे पाहुणे आता ती नक्की घरी आहे ना, गटाचे काम तर नाही ना, अशी खात्री करूनच यायला लागतात. हे वरवर बारीक वाटणारे पण खूप महत्त्वाचे बदल हळूहळू होतात, कुटुंबातील वातावरण बदलते, तिची प्रतिष्ठा वाढते. तेव्हा तिचीही आतली ऊर्जा वाढते. घरी-दारी काहीतरी करावेसे वाटायला लागते मग कोणी स्व-रोजगाराचा विचार करते तर कोणी स्वतः शिवाय मैत्रिणींच्या आरोग्याचा विचार करते. मग कोणाला एकटी महिला असल्यामुळे अडचणीत सापडलेली मैत्रीण दिसते तर कोणाला अज्ञानामुळे सावकारीत अडकलेली कातकरी दिसते. झडझडून कामात पडल्यावर त्यांचे नेतृत्वगुण वाढीस लागतात. बचत गटातून उभे राहिलेले प्रबोधिनीचे संघटन पाठीशी असतेच त्यामळे हुरुप वाढतो!


## ♦ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ♦

- **अध्यक्ष** — डॉ. रघुनाथ माशेलकर
- **उपाध्यक्ष** — डॉ. विजय केळकर, कि. बा. (अण्णा) हजारे
- **कार्याध्यक्ष** — श. बा. तथा रवि पंडित
- **संचालक** — डॉ. गिरीश श्री. बापट
- **कार्यवाह** — वि. शं./सुभाष देशपांडे

आता ग्रामीण महिलेला वाटू लागलं फक्त आजचं बघून पुरणार नाही, उद्याचं बघायचं तर पोरी-सुना यांचाही विचार करायला हवा, त्यांच्या पाठीशी उभे रहायला हवे असं म्हणणाऱ्या महिलांचा गट तयार होतोय. हिरकणींचा गट खूप जोमाने वाढतो आहे. युवतींचा गट या वर्षी संख्याबळाने सगळ्यात मोठा तर आहेच पण कळीचा सुद्धा बनलाय! असे स्वयंप्रेरित मनुष्यबळ, नवीन काम सुरु केलेल्या वाडी-वस्तीत तयार होत आहे. वरवर बघितले तर कामाचे स्वरूप, आधीच्या वर्षांसारखेच दिसले तरी जबाबदारी घेणारा गट मात्र वेगळा आहे, नवीन आहे, वाढतो आहे!

खूप काळ सातत्याने केलेल्या बचत गटाच्या कामामुळे सावकारीचा दर सुद्धा लक्षणिय उतरला, आरोग्य तपासण्यांमुळे स्वतःसाठी दवाखान्यात जाणाऱ्या महिला संख्येने वाढल्या, किशोरी उपक्रमांमुळे शिकणाऱ्या मुली वाढल्या तर युवती उपक्रमात येणाऱ्यांमधले उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढले आणि महत्त्वाचे म्हणजे कामात आलेल्या बहुतेकींचे लग्नाचे वय वाढले आहे. गावातल्या 'महिला राखीव'ला संघटनेच्या पाठिंब्याचे बळ मिळाले. या सगळ्यात विकासातील 'महिला अनुशेष' भरून काढाण्यास कटिबद्ध असणारी महिलांचीच फळी दिसते.

या कामामागे आपलेपणाने उभा राहणारा, 'नामोल्लेख करू नका' असं म्हणणारा दात्यांचा मोठा गटही आहेच. तो तेवढाच खंबीरपणे पाठीशी उभा आहे, वाढतो आहे, त्यामुळे कामालाही जोर येत आहे. हे मात्र मुद्दाम सांगावेसे वाटते.

## ❖ परदेशी देणगीदार ❖

- आयडीआरएफ ७,६९,७५०/-
- नंदाताई काळे ७,००,०००/-
- सुभाष पुराणिक १,६८,६२५/-
- नंदिनी पंड्या २५,०००/-
- निर्मला लिमये २०,०००/-
- सतीश कुलकर्णी १७,०००/-
- लक्ष्मी देशमुख ५,०००/-
- नारायण देशमुख ५,०००/-

## ❖ सन्माननीय देणगीदार ❖

- श्री. चंद्रशेखर देसाई २५,००,०००/-
- रोटरी क्लब ऑफ पुणे, गांधी भवन १,८५,३८०/-
- श्री. अनंत सेटलवाड २०,००,०००/-
- एन. जी. परांजपे प्रतिष्ठान ५,९०,०००/-
- रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड ५,००,०००/-
- मुकुंद शांताराम जोशी ३,००,०००/-
- मिबा ड्रायवेटेक इंडिया २,५०,०००/-
- बायोवेद फार्म पी. एल. १,००,०००/-
- प्रदीप गणपती मराठे ७२,०००/-
- महात्मा फुले वास्तू संग्रहालय ५०,०००/-
- डी. व्ही. ब्रह्मे अँन्ड सन्स प्रा. लि. ५०,०००/-
- प्रदीप वसंत चिकटे ४०,०००/-

### ♦ रू. २५,००० /- ते ११,०००/- ♦

नितीन श्रीकृष्ण इंगळे, सुबोधन इंजिनिअरस प्रायव्हेट लिमिटेड, संदीप देवधर, अनुजा बर्वे, स्वप्ना मराठे, नितीन पटवर्धन, निर्मला क्षीरसागर, विनोद पटेल.

### ♦ रू. ५००१/- ते १०,०००/- ♦

आंबेकर हॉस्पिटल, अदिती जोशी, मिलिंद मोडक, अनिल देशमुख, जगन्नाथ शेट्टी, इनर व्हील क्लब ऑफ पुणे, अश्विनी कीर्तने निरुपमा मोडक

### ♦ रू ५०००/- चे देणगीदार ♦

प्रमोद जाधव, अमृता कुलकर्णी, अश्विनी गानू, शुभांगी कानिटकर, पोरवाल अॅड कंपनी, सुकृत उद्योग, विवेक क्षीरसागर, अरुण पुराणिक, नीता गडकरी, विनायक खांडवे, अलका पटवर्धन.

♦ ५०००/- रुपयाच्या आतील एकूण २० देणगीदारांनी देणगी दिली.

# स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) वार्षिक वृत्त

## राष्ट्रीय सौर शके १९४०-४१ (सन २०१८-१९)

दरवर्षी प्रमाणेच यंदाही महिलांच्या कामाची 'किशोरी', 'युवती', 'हिरकणी' व 'महिला' अशा गटांमध्ये विभागणी केली आहे. त्यानुसार सन २०१८-१९ चे वार्षिक वृत्त पुढे देत आहोत.

## ★ किशोरी विकास ★

**✻ गावपातळीवरील मेळावे :** ग्रामीण भागातील मुलांना नवीन कल्पना सुचणे, निरीक्षण करता येणे व त्यांच्यातील कल्पकता जागृत होण्यासाठी उन्हाळी सुट्टीमध्ये गाव पातळीवर मुलामुलींचे मेळावे घ्यायचे ठरवले. एप्रिल२०१८ मध्ये १६ युवतींचे प्रशिक्षक प्रशिक्षण घेतले. त्यात शब्दकोडी, गणिती पाढ्यांवर आधारित खेळ, मैदानी खेळ, पद्य अशा विषयावर आधारित सगळ्या मेळाव्याचे ३ तासांचे नियोजन केले. त्यासाठी अगदी मुले गोळा करण्यापासून सगळ्यांनी काम केले. २६ एप्रिल ते १० मे या काळात ३७ गावात हे मेळावे झाले, एकूण ११२७ मुले सहभागी झाली. यातील १० गावे उस्मानाबाद जिल्ह्यातील हराळी केंद्रातील होती.



**✻ नियामित तासिका :** या तासिका आपण भोर, वेल्हे, हवेली या तालुक्यातील माध्यमिक शाळांमध्ये घेतो. यंदा अशा तासिका ११ शाळांमध्ये झाल्या, यामध्ये २६० किशोरी सहभागी होत्या. वर्षभरात प्रत्येक शाळेमध्ये झालेल्या १६ तासिकांमध्ये परिचय सत्र, विज्ञान प्रयोग, गट कार्य, कथाकथन, वेळेचे नियोजन, निरीक्षण कौशल्य, वाचन कौशल्य, प्रश्न कौशल्य घेतले. या बरोबरच ओरिगामी, क्विलिंग, क्रेप कागदाच्या वस्तू बनवणे अशी कौशल्येही घेतली. यामध्ये राख्या बनवायला शिकवल्या, त्यापैकी १०० राख्या सैनिकांना पाठवल्या. सोंडे माथना या गावातील मुलामुलींचे तासिके नंतर विद्याव्रतही घेण्यात आले. त्यासाठी पूर्वतयारी शिबिर घेतले होते..

**✻ कथाकथन स्पर्धा :** सगळ्या शाळेत तासिकांना आधी कथाकथन कसे करावे या विषयीचे मार्गदर्शन करण्यासाठी साने गुरुजी कथामालेतील तज्ज्ञ आले होते. त्यानंतर सप्टेंबर २०१८ मध्ये ९ शाळांमधून कथाकथन स्पर्धा घेण्यात आल्या. एकूण १३० मुलामुलींनी प्रथम फेरीत सहभाग घेतला. प्रत्येक शाळेतून ३ प्रमाणे २७ जणांची दुसरी फेरी झाली, त्यातून चांगले कथाकथन करणाऱ्या तिघांचे क्रमांक काढले. शाळेत स्पर्धा घेतल्यामुळे यंदा मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



**✻ तंबूतील निवासी शिबिर :** यावर्षी किशोरींचे तीन दिवसांचे निवासी शिबिर बोरावळे या गावी दि. २२ ते २४ डिसेंबर २०१८ असे झाले. त्यात ९ शाळेतल्या १४३ किशोरी सहभागी झाल्या होत्या. नवनिर्मिती असा विषय घेऊन सगळ्या शिबिर सत्रांची योजना केली होती.

**✻ काही महत्त्वाचे :** या शिवाय रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन व कॅडन्स कंपनीने किशोरी विकासाचे उपक्रम घेत असणाऱ्या १० शाळांना खेळाचे साहित्य व शास्त्रीय प्रयोग करण्यासाठीचे साहित्य भेट दिले. कार्यक्रमानिमित्त कंपनीचे अधिकारी व रोटरी क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन प्रबोधिनीने केले.

## ★ वेल्हे सहनिवास ★

वेल्हे भागातील जास्वंद गिरिकन्या निवासाचे हे ५ वे वर्ष! यावर्षी या सहनिवासात २४ गावांमधल्या एकूण ३३ मुलींना प्रवेश दिला. त्यापैकी ९ युवती आहेत. निवासात राहिल्याने मुलींना अभ्यासाला वेळ मिळत आहे, म्हणून मुलींच्या अभ्यासात चांगली प्रगती जाणवत आहे. काही मुली निवासात ४ वर्षांपासून राहात असल्याने त्यांचे राहणीमान, बोलण्याचे धाडस, अभ्यासातील गुणवत्ता वाढली आहे असे लक्षात येते आहे. आपण मुलींचे राहण्याचे शुल्क घेत नाही पण जेवणासाठी

नाममात्र रोख शुल्क व गहू, तांदूळ असा शिधा बहुतेक मुली घरुन आणतात.

**✻ शनिवार शाळा :** शालेय शिक्षणा बरोबरच या वर्षी सुद्धा शनिवार शाळेची सत्रेही झाली. यामध्ये मुलींचे भावविश्व विस्तारावे म्हणून 'पॅडमॅन', 'पूर्णा', 'चक दे इंडिया' असे चित्रपट दाखवले. इंग्रजी व विज्ञान शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी पुण्यातून तज्ज्ञ मार्गदर्शक जात होते. संगणक प्रशिक्षणही झाले. त्यामुळे ७ वी पर्यंतच्या मुलीं संगणकाच्या मदतीने अभ्यास करायला शिकल्या.



या वर्षी वैदेहीताई पत्की ही निगडी प्रबोधिनी शाखेची कार्यकर्ती सहा महिने निवासात होती. ही ताई प्रबोधिनीच्या शाळेची विद्यार्थिनी आणि पदवी नंतर प्रबोधिनीचे पूर्णवेळ काम करत आहे. तिने मुलींना गाणी शिकवली आणि परिस्थितीची माहिती होण्यासाठी परिस्थिती ज्ञान तासिका, स्वओळख व ध्येय निश्चिती अशा तासिकाही घेतल्या. तिचा सहवास हा मुलींना सामाजिक कामाची प्रेरणा देणारा होता.

पुणे प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील युवक-युवतींनी स्वच्छतेवरील नाटक, पोवाडा, काही नृत्यप्रकार, भारूड असा कार्यक्रम सहनिवासातल्या मुलींसाठी केला व याच्याशी संवाद साधला. त्यांच्या पैकी काही विशेष व्यक्तींच्या कार्यक्षेत्राची ओळख सहनिवासाच्या मुलींनी करून घेतली. त्यात डॉक्टर, इंजिनिअर, कलाकार अशी मंडळी होती.

मुलींच्या विरंगुळ्यासाठी व नवीन माहिती व्हावी म्हणून या वर्षात २ सहलींची योजना केली होती. त्यात पुणे दर्शन झाले. मुलींनी शनिवारवाडा व पर्वती पाहिली. मुलींचा शारीरिक विकास होण्यासाठी मैदानावर दर आठवड्याला दल घेतले. यामधून मोठ्या वयोगटातील, एरवी खेळणाऱ्या मुलींचा व्यायाम तर होतोच पण सांघिक भावना वाढीस लागते.

निवासातल्या मुलींच्या पालकांशी संवादही फार गरजेचा असतो. यावर्षी निवासाच्या मुलींच्या ४ पालक बैठका झाल्या. यासाठी घेतलेल्या काही बैठकीत मुलींचे वडील पालकही आले होते. पहिल्या बैठकीमध्ये निवासाबद्दल माहिती, नियम सांगून मुलींसाठी वर्षभरात घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. नंतरच्या पालक बैठकीत मुलीची तीन महिन्यात काय प्रगती झाली. या बरोबरच गणेश उत्सवातील सहभागाबद्दल बोलणे झाले. तिसरी बैठक आई पालकां बरोबर नवरात्रात खाद्य पदार्थ बनवण्याची स्पर्धाही घेतली. चौथ्या बैठकीत महिला पालकांना आरोग्याची माहिती सांगितली व प्रबोधिनीच्या इतर कामाबद्दल माहिती दिली. वर्षभरात १९ मुलींच्या घरी गृहभेटी दिल्या.

## ⋆ युवती विकास ⋆

### ✻ नियमित तासिका

**१. इयत्ता ११ वी :** वेल्हे, दापोडे व विंझर अशा ३ कॉलेजमध्ये व्यक्तिमत्त्व विकसनाच्या प्रत्येकी ९ तासिका झाल्या. यामध्ये ३६ गावातून ८९ युवती सहभागी होत्या. या तासिकांमध्ये अभ्यास कौशल्य, प्रकल्प परिचय, भावना परिचय, गटकार्य, समस्या परिहार,तरुणाईची आव्हाने, ओरिगामी मासा, क्विलिंग फ्रेम, क्विलिंग बॉक्स अशी सत्रे झाली.

**२. इयत्ता १२ वी :** बारावीत गेलेल्या युवतींचाही संपर्क व्हावा म्हणून मागील वर्षी सुरु केलेल्या १२ वीच्या वर्गांवर अभ्यास नियोजन, ध्येय निश्चिती व करियर गाईडन्स अशी ३ सत्रे झाली. या सत्रांना तीनही कॉलेजमधील मिळून ४० गावातून १०९ युवती होत्या.



**युवती कौशल्य प्रशिक्षण वर्ग**

| प्रशिक्षण | एकूण वर्ग | कालावधी | गावे | सहभागी युवती |
|---|---|---|---|---|
| १. ओरिगामी मासा | १ | १ दिवस | १ | ८ |
| २. ओरिगामी समई | ३ | २ दिवस | ३ | ४४ |
| ३. ओरिगामी पेनस्टँड | २ | २ दिवस | २ | २७ |
| ४. क्विलिंग कानातले | ५ | १ दिवस | ५ | ४३ |
| ५. क्विलिंग बॉक्स | ३ | १ दिवस | ३ | ३० |
| ६. मोत्यांचे कानातले | २ | १ दिवस | २ | २५ |
| एकूण | १६ | | १६ | १८७ |

**✻ कौशल्य प्रशिक्षण वर्ग :** केळद, वेल्हे, दापोडे, वांजळे, हिरपोडी, फणसी अशा एकूण १६ वर्गात १६ गावातील १८७ युवतींसाठी १६ कौशल्य प्रशिक्षण वर्ग झाले.

**✻ अभ्यास सहल:** या वर्षी प्रथमच २ अभ्यास सहली काढल्या. या सहलींच्या निमित्ताने पुढील शिक्षणाची वेगवेगळी क्षेत्रे,

Company management production system बघायला मिळाले. या दौऱ्यासाठी एखादी जबाबदारी घेऊन काम करत आहेत अशा युवतींची निवड केली होती.

**१. कॉलेज भेटी :** पुण्यातील गरवारे, महर्षी कर्वे व एस. एन.डी.टी. या कॉलेजला ६ गावातील ९ युवतींनी भेटी दिल्या. त्यापैकी तिघींनी महर्षी कर्वेमध्ये प्रवेश घेतला. त्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती मिळेल असे आपण पाहिले.

**२. शिरवळ अभ्यास सहल :** एखाद्या कंपनीचे काम कसे चालते हे पाहण्याचा अनुभव १३ गावातील ३४ युवतींनी घेतला. या पैकी ६ युवती पहिल्यांदाच घरातून बाहेर पडल्या होत्या. अशा प्रकारे कंपनी पाहण्याचा अनुभव जवळ जवळ तीस जणी प्रथमच घेत होत्या.

भेटी दिलेल्या कंपनी – १. परांजपे ॲटोकास्ट प्रायवेट लिमिटेड २.राजगड सहकारी साखर कारखाना, भोर. तसेच सावित्रीबाई फुले जन्मठिकाण, नायगाव.

३. गोवा-कारवार अभ्यास सहलीत वेल्ह्यातील ३ युवतींचा सहभाग.

अशा प्रकारे एकूण २२ गावांतून ४६ युवती अभ्यास सहलीमध्ये सहभागी झाल्या.

**❋ युवती मेळावे :** वर्षभरात ४ गावांतील ८२ युवतींसाठी ४ मेळावे झाले.मेळाव्यांचे मुख्य विषय स्वयंरोजगार, नवरात्र आणि स्त्री शिक्षणामुळे होणारे बदल हे होते. या मेळाव्यांचा मुख्य उद्देश मुलींचा शिक्षणाचा स्तर वाढावा तसेच त्यांनी स्वयंरोजगाराच्या अंगाने काही प्रशिक्षणे घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे हा होता. या मेळाव्यांमध्ये विषयवार सत्रे, अनुभवकथन, गटकार्य, कृतिसत्रांचे नियोजन होते.

**❋ अन्य उपक्रम**

**१. गणेशोत्सव सहभाग :** वेल्हे सहनिवासातील २४ किशोरी व ९ युवतींचे ढोल-बर्चीचे पथक पहिल्यांदाच पुण्यातील गणेशोत्सवात सहभागी झाले.

**२. साहस शिबिर :** वेल्ह्यात ३ दिवसाचे मुक्कामी शिबिर झाले. या शिबिरात हराळी, पुणे, वेल्हे भागातील २५ गावातून ३५ युवती सहभागी झाल्या. सर्व युवतींचा अशा मुक्कामी साहस शिबिराचा हा पहिलाच अनुभव होता. त्यात किल्ला पाहणे, अनुभवकथन, मानसिक साहस, शारीरिक साहस, जोडीकार्य, गटकार्य, गटचर्चा यावर सत्रे झाली.

**३. अभ्यासगट :** २०१८-१९ मध्ये नव्यानेच सुरु झालेल्या अभ्यास गटात एकूण १५ युवतींचा सहभाग आहे. दोन वर्षांपासून सुरु असलेल्या प्रकल्पातील कातकरी समाज जीवनाचा अभ्यास करण्याचे नक्की झाले. जुलै २०१८ पासून अभ्यासाला सुरुवात झाली. मार्च २०१९ पर्यंत एकूण ६ बैठका व १ मार्गदर्शन सत्र झाले.

**४. युवती संघटन :** संपर्क वाढीसाठी फेब्रुवारी २०१७ मध्ये सुरु झालेल्या युवती संघटनेत ठरल्याप्रमाणे या गटातील युवतींसाठी वेगवेगळ्या सत्रांचे नियोजन झाले तसेच छोटे-छोटे प्रकल्प आखून त्यावर या गटाने काम करणे सुरु केले. या गटासाठी वर्षभरात फिल्म पाहणे, पथनाट्य सादरीकरण, महिला दिनानिमित्त वादविवाद स्पर्धा, प्रशिक्षण वर्ग, साहस शिबिर झाले तसेच दोन गावांमध्ये स्वच्छता उपक्रमही या गटाने राबविला. या युवती संघटन गटाच्या वषभरात ७ बैठका झाल्या.

**५. १०वी, १२वी पुढील शिक्षण** : आपल्या प्रयत्नामुळे दिलेल्या कॉलेज भेटी व करियर गाईडन्स सत्रांना आलेल्यांपैकी महर्षी कर्वे इन्स्टिट्यूटमध्ये ए.एन.एम. कोर्स (१), जी.एन.एम. कोर्स (२) व ११ वी (१) अशा ४ युवतींनी प्रवेश घेतला.

## ★ बालवाडी ★

जून २०१८ पासून एकूण ७ बालवाड्या सुरू झाल्या. या सात बालवाड्यांमुळे एकूण ७५ मुले-मुली शिक्षण प्रवाहात आली. आपण चालवलेल्या बालवाड्यांमधून मुलांना मॉन्टेसरी पद्धतीने बाल शिक्षण दिले. या बालवाडीची शिक्षिका गावातलीच असल्यामुळे तिला मुलांच्या घरातील वातावरण, आजूबाजूचा परिसर माहिती असतो. त्यांच्या दरमहा घेणाऱ्या प्रशिक्षणामुळे मुलांच्या वाढ विकासासाठी त्या योग्य तो प्रयत्न करतात.



**❋ मुलांसाठी विशेष उपक्रम:**

**१. चित्रकला स्पर्धा :** यावर्षी सलग दोन वेळा बालवाडीतील विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा झाली. मुलांना चित्राचा कागद व रंगीत खडू देण्यात आले. पालकांच्या मदतीने, मुलांनी कल्पकतेने चित्र रंगवले. सर्व बालवाडीतील मुलांची चित्रे एकत्र करून बाह्य परीक्षकांच्या मदतीने स्पर्धेतील मुलांचे नंबर काढले व गावातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या हस्ते बक्षीस वाटप केले.

**२. गीत सादरीकरण :** १५ ऑगस्ट व २६ जानेवारी अशा राष्ट्रीय कार्यक्रमात काही बालवाडीतील मुलांनी भाषण करणे, देशभक्तीपर गीत सादर करणे, असे संधी घेतली.

**३. सहल :** या वर्षी वेल्ह्याजवळच्या ५ बालवाडीतील मुलांची सहल पासली येथील मँगो हाउस या ठिकाणी गेली होती. या ठिकाणी मुलांना खेळण्यासाठी आधुनिक खेळणी आहेत. या सहलीचा प्रवास खर्च पालकांनी केला. काही पालकांनीही स्वखर्चाने या सहलीत भाग घेतला.

**❋ शिक्षकांसाठी विशेष उपक्रम:**

**१. कार्यसंकल्प तयार करणे :** वर्षारंभ उपासना कार्यक्रमात बालवाडी घेणाऱ्या सर्व शिक्षिका सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमात बालवाडीच्या वार्षिक कार्य संकल्पाचे वाचन झाले.

**२. बालवाडीताईंची सहल :** बालवाडीताईंची सहल पुणे येथील ज्ञान प्रबोधिनीची वास्तू पाहणे, सारसबाग, पेशवे पार्क पाहणे अशी झाली (एप्रिल२०१८). या सहलीत सर्व ताईंचा सहभाग होता तर डिसेंबरमध्ये सज्जनगडावर जाण्याची दुसरी निवासी सहल झाली. या सहलीमुळे चांगली गट बांधणी झाली असे सगळ्यांना वाटले.

**❋ पालकांसाठी विविध उपक्रम**

**१. मेळावा :** ऑक्टोबर महिन्यात माता पालकांसाठी वेल्हे येथे नवरात्रीनिमित्त मेळावा झाला. एकूण ६० जणींची उपस्थिती होती. पालकांचे विविध खेळ झाले, पारंपरिक खेळातही सहभाग छान होता. काही जणींनी पारंपरिक वेशभूषा केली होती. तीन तास खूप उत्साहाचे वातावरण होते. पालकांच्या स्पर्धेचे बक्षीस वाटप होऊन मेळाव्याचा समारोप झाला.

**२. पालकसभा :** प्रत्येक बालवाडीत वर्षातून ३ वेळा पालकसभा झाल्या. मुलांच्यासाठी वर्गात घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती अंगणवाडी ताईने पालकांना दिली व प्रबोधिनीच्या शिक्षणाची भूमिका स्पष्ट करुन सांगितली. विशेष म्हणजे यावेळी मार्गदर्शक म्हणून गावातच काम करणाऱ्या प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या उपस्थित होत्या. प्रबोधिनीच्या कामाचा विस्तार आणि मनुष्य शक्ती वाढवणे असे विषय या पालक सभेत मुद्दा योजले गेले.

**❋ देणगीदार भेट :** देवपाल, जाधववाडी व कुसगाव या तीन बालवाडीला टेल्को कर्मचारी यांच्या रिटायर्ड ग्रुपचे श्री. राजीव नातू आणि सहकारी यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. देवपाल बालवाडीच्या भिंती 'बोलक्या करणे' व पाण्याची टाकी बांधून देणे असे काम या गटाच्या देणगीतून झाले. सौ. कलीकाताई जोशी यांनी हिरापूडीच्या अंगणवाडीला भेट दिली, माता पालकांसाठी संक्रांतीचे हळदी-कुंकू केले आणि अंगणवाडीला कपाट भेट दिले.

## ⋆ नवचैतन्य गट ⋆

गाव पातळीवरील दल म्हणजेच नवचैतन्य गट

जून २०१८ पासून विविध गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधल्या १ली ते ७वीतील विद्यार्थ्यांसाठी दले सुरू झाली. त्यासाठी ३ महिने आधी पासून म्हणजे एप्रिल पासून पूर्वतयारी केली. एप्रिलमध्ये आंबवणे गावात या दलांच्या ताईंचे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली. प्रशिक्षणात 'दलावर आज्ञा कशा द्यायच्या' इथपासून ते गावात मुलांचे खेळ घेताना सूत्र काय ठरवायचे यावर बोलणे झाले. खेळातून मुलांचा दम टिकवणे, शरीराची लवचिकता वाढवणे असे उद्दिष्ट निश्चित केले. उद्दिष्टांवर आधारित खेळाचे प्रशिक्षणही मासिक बैठकीत दिले. यानंतर एकूण १३ गावात १७ ठिकाणी दले सुरु झाली. त्यात ३४० विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रत्येक दल आठवड्यातून दोन वेळा एक तासांचे झाले. बहुतेक सर्वच ठिकाणचे दल मुख्याध्यापकांच्या लेखी परवानगीने शाळेच्या मैदानावर झाले.



**बैठक**

**❋ मासिक बैठक :** दलाच्या प्रशिक्षकांची बैठक प्रत्येक महिन्याला आंबवणे केंद्रामध्ये झाली.या बैठकीला साधारण १९ सदस्यांची उपस्थिती असायची.

**❋ नियोजन-निवेदनाच्या बैठकी :** या बैठकीत विविध खेळ प्रत्यक्ष खेळणे असे असायचे आणि दल घेताना आलेल्या अडचणींवर चर्चाही व्हायची. वर्षभराच्या सरावाने व नियमित बैठकीमुळे बहुतेक सर्व जणी व्यवस्थित नियोजन करु लागल्या.

**❋ पालक भेटी :** मुलांचा दलावर नियमितपणा टिकावा व गुंतवणूक वाढावी म्हणून दलावर येणाऱ्या मुलांच्या घरी जाऊन दल घेणाऱ्यांच्या पालक भेटी होतील असे पाहिले. या गृहभेटीमुळे ज्या मुलाच्या घरी जायचे त्याची दलावरील उपस्थिती, खेळातील आवडीनिवडी अशा गोष्टींचे निरीक्षण व्हायला लागले.

**❋ विशेष उपक्रम :** १४नोव्हें. रोजी आंबवण्यामध्ये बाल आनंद मेळावा घेतला. या मेळाव्याला ६ गावांमधून साधारण ८० जणांची उपस्थिती होती. मेळाव्यात मुलांचे मनोरंजन व बौद्धिक विकसन होईल असे खेळ घेतले. मेळाव्याच्या मार्गदर्शक

म्हणून युवती प्रकल्प प्रमुख प्रतिभाताई स्वामी व त्यांच्या सहकारी आल्या होत्या. त्यांनी मुलांना भेटकार्ड बनवायला शिकवले. तसेच दलावरच्या खेळाचे महत्त्व पटवून दिले.

**※ स्पर्धा :** डिसेंबर, जानेवारी महिन्यात दलादलावर झालेल्या स्पर्धांची बक्षिसे २६ जानेवारीच्या ध्वजवंदना नंतर शाळेतच मुख्याध्यापक व प्रतिष्ठित मान्यवरांनी दिली. दलावर येणाऱ्या एकूण ३४० पैकी ६० मुलांना गाव पातळी वरील कुठल्या तरी स्पर्धेत बक्षिस मिळाले. अशा उपक्रमामुळे मुलांच्या शारीरिक विकासाबरोबर मानसिक विकासही होतो. बहुतेक कार्यक्रमात दल घेणाऱ्या ताईंचे शाळेच्या वतीने सत्कार केले गेले.

**※ गणवेश :** दल घेणाऱ्या ताई गणवेश घालूनच दल घेतात. या विशेष गणवेशामुळे कामात सुरक्षित वाटते आणि वेगळा मान मिळतो, असे काम करणाऱ्यांनी मुद्दामून सांगितले. गणवेशामुळे काम आनंददायी आणि सुखकर झाले!

## ★ खेळघर ★

**※ खेळघर एक नवीन उपक्रम :** आंबवणे केंद्रात ६जानेवारीपासून खेळघर सुरू झाले. साधारण २५ प्रकारची खेळणी या खेळघरात खेळायला ठेवली. खेळघराचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे लहान वयातल्या मुलांनी खेळण्यात दंग होउन जावे रंगून जावे असे खेळ खेळायला मिळावेत. खेळताना मुलांचा स्नायू विकास होईल अशी जमेची बाजू पालकांना शिकवणे. आठवड्यातून दोन दिवस दोन तास हे खेळघर सुरू झाले.सध्या हे खेळ बालवाडीपासून चौथीपर्यंतच्या मुलांसाठी खेळायला ठेवले आहेत. या खेळघरात लहान मुलांच्या सोबत खेळ खेळायला पालकांनीही आवर्जून यावे असा आग्रह आपण धरला आहे.

## ★ हिरकणी विकास ★

यंदा हिरकणी उपक्रमाने ५ वर्षांचा टप्पा पार केला. ०-६ वयोगटातील मुले असणाऱ्या किमान १५ माता एका गावात अशी ९ गावात नियमित प्रशिक्षण सत्रे झाली. यासाठी जून पासून गावात संपर्क केला. ऑक्टोबर पर्यंत दरमहा एक दिवस गाव भेट ठरवली. गावात जाऊन गृहभेटी, नागपंचमी मेळावे, नवरात्र मेळावे आणि प्रशिक्षकांची मुलाखत घेणे, या नियोजनामुळे गावातल्या मातांची ओळख होणे सोपे गेले. नोव्हेंबर पासून प्रत्यक्ष सत्राला सुरुवात झाली. ९ गावातून साधारण १३० मातांनी त्यांच्या गावातील हा प्रशिक्षण वर्ग समाधानकारक सहभागाने पूर्ण केला. गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रशिक्षण सत्र सुरु होण्याच्या आधीपासून केलेल्या संपर्कामुळे सत्रातील मातांची नियमितता वाढली.

**※ प्रशिक्षक प्रशिक्षण :** मे महिन्यामध्ये हिरकणीच्या २२ प्रशिक्षकांचे ४ दिवसाचे प्रशिक्षण वेल्हे केंद्रात झाले. या प्रशिक्षणामध्ये सोलापूर, हराळी येथूनही ९ जणी सहभागी झाल्या होत्या. ३ दिवस अभ्यासक्रमावर आधारित व्याख्याने, कृती सत्रे होती तर एक दिवस गावात जाऊन प्रत्यक्ष हिरकणी मातांचे मेळावे घेणे असा कार्यक्रम होता.



**※ प्रकल्प विस्तार :** हिरकणी प्रकल्प विस्तार म्हणून भोर तालुक्यातील नऱ्हे येथे विस्तार मेळावा घेतला. ६५ महिला या मेळाव्यात सहभागी झाल्या. खेळ, हस्तकौशल्य अशा स्पर्धा घेतल्या, विजेत्यांना महिला सरपंचाच्या हस्ते बक्षीसे दिली. यावर्षी हिरकणी मार्गदर्शक पुस्तिका तयार झाली. ती विस्तारासाठी हिरकणी उपक्रम कसा काम करेल यासाठी वापरता येईल.

**※ स्थानिक मनुष्यशक्ती भर :** हिरकणी प्रशिक्षक म्हणून यंदा ३ जणींची नव्याने प्रशिक्षक गटात भर पडली, आता हा गट १५ जणींचा झाला.महिलांच्या तंबू शिबिरात यातल्या ११ जणी सहभागी झाल्या तर ७ जणींनी प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रमात प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा घेतली. या शिवाय आरोग्य प्रकल्प, स्वयंरोजगार प्रशिक्षण संधी, बचत गट, नवरात्री मेळावे अशा सहभागामुळे या गटांचा आत्मविश्वास वाढल्याचे जाणवते आहे.



हिरकणी गटाचा विविध उपक्रमामधला सहभाग उल्लेखनीय वाढला आहे. जबाबदारी घेऊन नियोजनपूर्वक काम करण्याची सवयही या गटातील सदस्यांना झाली आहे.

यावर्षी हिरकणी, नवचेतना व बालवाडी या तीन विभागाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्या गटांची एकत्र सहल सज्जनगडावर काढली. सहलीचे खाते वाटप करून, प्रत्येकीने योग्य पद्धतीने जबाबदारी पार पडली. ठिकाण, गाडी ठरवण्या पासूनच या गटाने उत्साहाने काम केले. सहभागी १७ जणीं पैकी प्रत्येकीने प्रवास खर्च आपापला केला. स्मार्टफोनचा वापर करून गुगल

वरून गडाची माहिती एकत्र करून प्रत्यक्ष गडावर त्याचे वाचनसुद्धा केले. त्यामुळे सहल माहितीपर ही झाली.

* **व्यक्तिविकास संधी :** यशवंतराव मुक्त विद्यापीठाच्या आपल्या संपर्कामुळे साधारण १७५ पेक्षा जास्त जणींनी १२ वी समकक्ष परीक्षा दिली. पुढे शिकलेला १०-१२ जणींचा गट पदवीकडे वाटचाल करीत आहे. एफ. वाय. बी. ए. ला असणाऱ्या गटाने परीक्षा देऊन एस. वाय. बी. ए. ला प्रवेश घेतला. नव्याने ८ जणींनी प्रवेश परीक्षा दिली.

## ★ महिला विकास ★

### बचतगट

बचत गट या माध्यमाचा उपयोग गेली जवळपास २५ वर्ष एखाद्या गावात नव्याने कामाला सुरुवात करताना करत आहोत. बचत गट सहभागामुळे ग्रामीण महिला आर्थिक व्यवहार करायला शिकल्या. आता 'महिला बचत गट' गावात रुळले. महिला आत्मविश्वासाने आपापला हिशोब करू लागल्या त्यामुळे आपण आपल्या कामातून जास्तीत जास्त महिलांचा सर्वांगीण विकास होईल अशा योजना आखल्या. केवळ बचत किती केली, कर्ज घेतले ना? उत्पादक वापरले ना? बँकेशी जोडणी कशी करायची या पलीकडे जाउन 'ती'ने तिच्या आरोग्याचा विचार करावा, उत्पादक काम करून घराला आर्थिक हातभार लावावा, गटाचे नेतृत्व करताना निर्णय प्रक्रियेत सहभाग घ्यावा यावर भर दिला.

| | गावे | गट | सभासद | मासिक बचत रु |
|---|---|---|---|---|
| हवेली | ४ | ११ | २१७ | १३५,४०० |
| वेल्हे | ३८ | १०४ | १८७५ | २२४,५५० |
| भोर | १२ | १११ | १८६४ | ४१५,२०० |
| सातारा | १ | ३ | ५१ | ५,१०० |
| पुणे | १ | ७ | १२४ | ११७,००० |
| | ५६ | २३६ | ४१३१ | ८९७२५० |

या वर्षी प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाने ५६ गावात २३६ बचत गट चालू होते त्याचा तपशील खाली देत आहे.

यंदा नव्याने वेल्ह्याच्या छोट्या वाडी-वस्तीवर बचत गट पोहोचेल असे आपण पाहिले. गटाने बँकेशी केलेले व्यवहार आता गटाच्या अंगवळणी पडले आहे. विजया बँकेने यंदा काही गटांना मिळून २० लाखापेक्षा जास्त कर्ज दिले आहेत.

वर्ष अखेरपर्यंत नाबार्डचा अँड ऑन हा तिसरा प्रकल्प पूर्ण झाला. एकूण १५० गटांना बँकेतून १.८४ कोटी रुपये कर्ज म्हणून आपण मिळवून दिले. त्यासाठी विजया बँक, जनता बँक व सेंट्रल बँकेसोबत काम केले. सर्व कर्ज व्याजासहित परतफेड होईल असेही पाहिले. या निमित्ताने १५० गटातील २४६४ सभासदांचे बँकेच्या व्यवहाराबद्दल तपशिलात प्रशिक्षण घेतले.

प्रथमच बँकेत जाणाऱ्या बाईला बँक व्यवहारा संबंधी खूप प्रश्न असतात. अशा येणाऱ्या बारीक सारीक अडचणी आपण प्रशिक्षणातून सोडवतो. काही अडचणी प्रत्येकीच्याच मनात असतात. त्यामुळे त्या अडचणी आणि त्यांची उत्तरे यांचे संकलन करून आपण **'बँकेत पाऊल टाकण्यापूर्वी'** अशी एक छोटीशी प्रशिक्षण पुस्तिका तयार केली. त्याचे प्रकाशन 'रोटरी क्लब ऑफ पुणे साउथ' याच्या आर्थिक मदतीने, आंबवणे गावातच केले. कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. मोहन पटवर्धन व अन्य पदाधिकारी आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबोधिनीचे कार्यवाह उपस्थित होते.

* **डेली कलेक्शन:** उद्योग करणाऱ्यांना अनेकदा खेळत्या भांडवलाची चणचण जाणवते, त्यावर उपाय म्हणून आपण 'रोज थोडी फेड' अशा तत्त्वावर काही जणींना प्रत्येकी किमान रु. २०,०००/- भांडवल दिले. यासाठी एकूण रु. २,४०,०००/- निधी १७ जणींसाठी टप्प्याटप्प्यात वापरला. अशा तऱ्हेने महिलांनी पुढाकार घेऊन केलेल्या उद्योगांना बळ मिळाले. अशा प्रकारच्या खात्रीच्या आर्थिक मदतीने महिला अधिक उद्योगी बनतील असेही लक्षात आले. असेही लक्षात आले की काही उद्योग इतक्या थोड्या भांडवलाने सुरु होतात की त्यासाठी बँकेत जाणे परवडत नाही. पण हे उद्योग असे परतावा देतात की एखाद्या कुटुंबाची किमान आर्थिक गरज भागेल इतके उत्पादन घराला मिळू शकते. या योजनेसाठी अमेरिकेतल्या श्री. कुलकर्णी यांनी मदत केली.

* **वैयक्तिक खरेदीसाठी मदत :** नव्याने सुरु झालेल्या बचत गटातून कर्ज मिळू शकले तरी ते कशासाठी घ्यायचे ? असाही प्रश्न काहींना पडत होता. त्यावर बैठकीत चर्चा केली. त्यातून सामान ठेवायला कपाट खरेदी करणे, स्वयंपाक करताना बाईचे वाटणाचे काम कमी करायला मिक्सर घेणे असे पर्याय निघाले. त्यातून १२,०००/- रुपयाचे एक अशी ९ कपाटे व ३०००/-रुपयाचा एक असे ८ मिक्सर अशी कर्ज घेऊन खरेदी कर्ज घेऊन केली. बहुतेक गावात असे करणाऱ्या गट प्रमुख होत्या. आता टप्प्याटप्प्यात ते कर्ज फेडले जात आहे. वेल्ह्याच्या अती ग्रामीण भागात जीवन दर्जा सुधारायला अशाही मदतीची अजून गरज आहे, असे या निमित्ताने लक्षात आले.

## ★ स्वयंरोजगार ★

* **राम-सीता तंत्र निकेतन :** गेली अनेक वर्षे शिवण हा आपण मुख्य विषय म्हणून धरून ठेवला आहे. आता शिवणामध्ये

स्थानिक लोकांसाठी लागणारे कौशल्य–जसे ब्लाउज शिवणे, ड्रेस शिवणे– या बरोबरच उत्पादन करण्यासाठी काही गोष्टी शिकवल्या. यंदा पिशव्या व त्यांचे प्रकार याची भर घातली. प्लास्टिक बंदी झाल्यामुळे कापडी पिशव्यांना चांगली मागणी होती. त्यामुळे या कौशल्याचा उत्पादकतेसाठी उपयोग झाला.

- नियमित शिवण वर्गाशिवाय असे एकूण १४ वर्ग झाले. त्यात १२६ जणांनी प्रशिक्षण घेतले.
- या वर्षी राम–सीता पुराणिक तंत्र निकेतनामध्ये आलेल्या महिलांनी ३४,९५९/– रुपयांचे उत्पादन केले.
- विशेष म्हणजे खोपी गावात १५ मुलींसाठी कॉम्प्युटरवर्ग घेतला. त्यापैकी आठ मुलींनी तो पूर्ण केला. हा वर्ग पूर्ण झाल्यानंतर खोपी गावातच १४ मुलींसाठी आणि वडगाव झांजे या गावांमध्ये १३ मुलींसाठी शिवणवर्ग घेतला. या दोन्ही वर्गाची शिक्षिका गावपातळीवर जात होती, म्हणून हे जमले.

| | | | |
|---|---|---|---|
| ➢ | **नियमित शिवण वर्ग** | | |
| १. | ६ महिन्याचा शिवण वर्ग | | ३ |
| २. | १ महिन्याचा शिवण वर्ग | | ७ |

| | | वर्ग संख्या | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| ➢ | **उत्पादक वर्ग** | | |
| २. | होलशिट (डॉक्टरांसाठी ) | १ | ४ |
| ३. | झबले–टोपडे | १ | १ |
| ➢ | **पिशव्या प्रकार** | | |
| ४. | साडीपासून पिशवी | १ | ५ |
| ५. | करीबॅगला पर्याय पिशवी | १ | १ |
| ६. | भाजीची कप्प्याची पिशवी | १ | ७ |
| ➢ | **अन्य कौशल्ये** | | |
| १. | राखी उत्पादन | १ | ३५ मुले |
| २. | कौशल्य प्रशिक्षण (ओरिगामी) | २ | १० |
| ३. | वाख प्रशिक्षण | १ | ६ |
| ४. | कागदी पिशवी | १ | १२ |
| ५. | मणीकाम वर्ग | २ | १५ |
| ➢ | **विशेष कौशल्ये** | | |
| ६. | केक प्रशिक्षण | १ | १४ |
| ७. | बेसिक कॉम्प्युटर वर्ग | १ | ९ |
| | | १४ | १२६ |

**✻ कै. काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजकता पुरस्कार :** या पुरस्काराचे वितरण शिवापूर येथे केले. त्यासाठी १० उद्योजिकांना शोधून त्यातून ३ जणींना पुरस्कार द्यायचे ठरवले. ही निवड करताना ज्यांनी इतरांना रोजगार पुरवला आहे अशांची निवड केली. एका कंपनीत हॉटेल चालवणाऱ्या सौ. लीला कोंडे यांना मुख्य पुरस्कार तर कविता रेणुसे (शेवई उद्योग) व हर्षदा शिंदे (कापडी पिशव्या उत्पादन) या दोघींना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमास श्री. अनिल व सौ. अनुराधा सुपनेकर तसेच श्री. शशिकांत सुपनेकर आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रबोधिनीचे कार्यवाह सुभाषराव देशपांडे होते.

**✻ या शिवाय केलेल्या काही गोष्टी :** यंदाही भात लावणीच्या ४ सहली झाल्या. त्या सहलीत १३० जण सहभागी झाले होते. यातून रु.१२,०००/– रकमेची उलाढाल झाली.त्या निमित्ताने आपल्या कामाचा परिचय या चारही गटांना झाला.

वर्षभरात अशा प्रकारे विविध प्रकल्पातून, प्रशिक्षणातून तयार झालेल्या उत्पादनापैकी रु. ३,२५,०००/– च्या उत्पादन विक्रीसाठी आपण मदत केली.

तसेच गावपातळीवर चॉकलेट व केक प्रशिक्षणासाठी ओव्हन व साहित्य दिले तर शिवणासाठी नवीन यंत्रे दिली. त्याच बरोबर इतर स्वयंरोजगार उत्पादन विक्रीसाठी वजनकाटा, पॅकिंग मशीन अशी वस्तुरूप देणगी दिली. यामुळे आपण एकूण ६७ जणींचे प्रशिक्षण घेऊ शकलो.

रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन व कॅडेंस कंपनी यांनी भांडवली गुंतवणूक केली तर त्यांच्याच सहयोगाने वेल्ह्याच्या नातू सभागृहाचे नूतनीकरण केले.

## ⋆ आरोग्य ⋆

शब्द ते शक्ती व आरोग्य सखी या प्रकल्पात केलेल्या काही तपासण्या–

**✻ कॅन्सर जागृती व तपासणी :** डॉ शुभांगी कानिटकर आणि सहकारी यांनी वर्षभरात १६ गावात कॅम्प्स घेतले. त्यात ३१५ जणी माहिती ऐकायला आल्या होत्या तर १४९ जणींनी पॅप्स्मिअर तपासणी करून घेतली. ही तपासणी ज्येष्ठ महिला डॉक्टर गाव पातळीवर गेल्यामुळेच करता आली. ३७ जणींना पुढील उपचाराची आवश्यकता आहे असे लक्षात आले, त्यापैकी २२ जणींची तशी ऑपरेशन्स दीनानाथ रुग्णालयात झाली.

**✻ दाताचा दवाखाना :** आंबवणे केंद्रात चालू केलेल्या दत्तात्रय दाताच्या दवाखान्यात यंदा एक्स रे मशीन आणल्यामुळे आता दाताचे रूट कॅनल करण्याची सोयही झाली. डॉ. वैदेही व डॉ. अनुजा यांनी वर्षभरात १३ कॅम्प्स मधून १२५ पेशंट तपासले.

**✻ डोळे तपासणी शिबीर :** ४ गावात मिळून वर्षभरात १२२ पेशंट तपासणीचे काम झाले. त्यातून ७ जणांच्या मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया शिरवळच्या कमला मेहेता नेत्र रुग्णालयात झाल्या.

**✻ गरोदर महिला तपासणी शिबीर :** साखर गावाला ९ कॅम्प्स झाले त्यात १२६ पेशंटस्‌ची तपासणी झाली.

**✽ आरोग्य सखी प्रकल्प :** वेल्हे तालुक्यामध्ये आरोग्याच्या कामाला आपण १९९७ पासून सुरुवात केली. भागाच्या दुर्गमतेमुळे व आर्थिक कारणांमुळे महिला आरोग्य या विषयावर सातत्याने काम करण्याची गरज आजही आहे म्हणून बजाज इनव्हेस्टमेंटस व होल्डिंग यांच्या आर्थिक सहकार्याने आपण आरोग्य सखी हा प्रकल्प १ जानेवारी २०१९ पासून सुरु केला. आता प्रकल्पाने चांगली गती घेतली आहे. या प्रकल्पात प्रत्यक्ष डॉक्टरांनी येउन तपासणी करणे असे तर आहेच पण त्या सोबत आरोग्याच्या जाणीव जागृतीचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आखले आहेत. या प्रकल्पाचे काम गावोगावी जाउन करायचे आहे त्यासाठी या प्रकल्पातून नविन जीप खरेदी केली.

प्रकल्पाच्या पहिल्या ३ महिन्यात जाणीव जागृतीचे जे कार्यक्रम झाले त्याचा तपशील खाली देत आहे.

| क्र. | विषय | कार्यक्रम | सहभागी गट |
|---|---|---|---|
| १ | ओळख स्पर्शाची | ५ | २२० |
| २ | सॅनिटरी पॅड वापर | २ | ३४ |
| ३ | स्त्री आरोग्य प्रश्न | ४ | १०० |
| ४ | जंत संसर्ग माहीती | ५ | ९८ |
| | | **१६** | **४५२** |

या जाणिव जागृतीच्या १६ कार्यक्रमात मिळून एकूण ४५२ सहभागी पर्यंत आपण पोहोचलो.

## ★ नेतृत्व विकसन ★

गाव पातळीवरचे मेळावे हे नेतृत्व विकासाच्या अभिव्यक्तीचे एक महत्त्वाचे अंग आहे. वार्षिक उद्दिष्टामध्ये आपण मेळाव्याचे उद्दिष्ट ठरवतो तसे नियोजनही करतो. गरज पडल्यास प्रशिक्षणाची योजनाही करतो. यावर्षी हिशोबाचे, नवरात्रीचे व संक्रांतीचे मेळावे योजले. मेळावे गावातच असले तरी विषया– प्रमाणे पुढाकार घेणाऱ्या महिला वेगवेगळ्या असतात. मेळावे खालील प्रमाणे झाले.

**✽ मेळावे :** बचत गटाच्या ३१ मार्च २०१८ रोजी पूर्ण झालेल्या वर्षाच्या हिशोबासंदर्भात एप्रिल–मे महिन्यात १३ गावांमध्ये मेळावे झाले. गावोगावी सगळ्या गटांच्या एकत्रित झालेल्या मेळाव्यात बारकाईने हिशोब तपासणी झाली.



**✽ नवरात्र मेळावे :** नवरात्र मेळाव्यांचे हे चौथे वर्ष! नियोजनपूर्वक घेतलेल्या या मेळाव्यात कमी कालावधीमध्ये म्हणजे फक्त ७ दिवसात ४५ गावात १३४७ जणी सहभागी झाल्या. अगदी ८५ लोकसंख्या असणाऱ्या वाडी पासून १२०० लोकसंख्येच्या गावापर्यंत हे मेळावे झाले. नियोजनापासून कार्यवाही पर्यंत पत्कर घेतलेल्या ६२ जणींचा गट या निमित्ताने बांधला गेला. या मेळाव्यात खेळ होते, स्पर्धा होत्या, स्थानिक कार्यकर्तीने केलेले नवीन गाणे होते. मग येत्या वर्षात गावात महिलांसाठी काय करायचे याचे सगळ्यांनी मिळून नियोजन करायचे होते. सगळ्यात शेवटी बक्षीस वाटप केले जात होते आणि जी महिला वर्षभर गावात धडपड करून काम करत होती तिचा साडी देऊन सत्कार केला जात होता. या सत्काराच्या साड्या पुण्यातल्या ४३ मैत्रिणींनी मेळाव्याला मदत म्हणून दिल्या होत्या. त्यासाठी नवरात्रीतली ओटी भरण्यासाठी म्हणून व्हॉट्स ॲप वरून आवाहन केले होते. त्याला लगेच आणि उदंड प्रतिसाद मिळाला. अशा शंभरपेक्षा जास्त जमा झालेल्या साड्या गावपातळीवर काम करणाऱ्या धडपड्या महिला व कार्यकर्त्यांच्या सत्काराच्या वेळी दिल्या. अनेक विषय या मेळाव्याच्या निमिताने चर्चेत आले त्यात महिला आरोग्य तपासणी, गावात दल सुरु करणे, सहलीचे नियोजन, गावात उद्योजकतेचा वर्ग घेणे असे वेगवेगळे विषय होते. या निमिताने झाला तो स्त्री शक्तीचा जागर!

**✽ तीळगुळ मेळावे :** आंबवणे परिसरातल्या नवदिशा बैठकीमध्ये नियमित येणाऱ्या १५ जणींच्या गावात तीळगुळ मेळावे घेण्यात आले. गावातील कार्यकर्त्यांनी जबाबदारी घेऊन आपापल्या गावात हे मेळावे घेतले. काही मेळाव्यांचा खर्च त्या त्या ग्राम पंचायतीतील महिलांसाठी राखीव असणाऱ्या १०% निधीतून करण्यात आला.

एक विशेष मेळावा ६ स्वावलंबी गाव प्रकल्पातील जाणत्या महिलांचा वेल्हे कार्यालयात घेतला. त्या मेळाव्यामध्ये आपापल्या गावात जाणवणाऱ्या काही प्रश्नांची यादी करून कामाचा प्राधान्यक्रम ठरवण्यासाठी विचार करण्यात आला. या प्रश्नांवर चर्चा फारच रंजक झाली. शेवटी ज्या त्या गावाच्या गरजेनुसार गावांमध्ये काम करावे असे ठरवले. त्याप्रमाणे काम करायला सुरुवात केली.

**✽ सहलींचे आयोजन :** स्थानिक नेतृत्व विकसनाची संधी म्हणून गाव पातळीवरच्या सहलींचे आयोजन केले जाते. या वर्षी ११ सहलीमध्ये ५६ गावातल्या २०४ जणी सहभागी झाल्या होत्या. यामध्ये आपल्याच भागातील मढेघाट बघण्याच्या दिवस

भराच्या सहली पासून परराज्यातील बालाजी दर्शनाच्या ६ दिवसांच्या सहली पर्यंतची विविधता होती. बहुतेक सहली या स्वखर्चाने झाल्या. काही सहलीसाठी बचत गटातून कर्जाची सोय केली होती. स्वतःसाठी वेळ काढणे व थोडीशी रक्कम उभी करणे याचेही शिक्षण सहल सहभागामुळे होते. स्वतःची चौकट ओलांडायला, दृष्टी विस्तारायला अशा महिलांनी महिलांच्या काढलेल्या सहली उपयोगी पडतात.

**❋ महिला दिन :** महिला दिनाच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधनाचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा एकत्रित कार्यक्रम ग्रामीण विभागाने योजला. त्यात वेल्हा, भोर, हवेली ह्या तीन तालुक्यातील ३८ गावातील १७५ महिलांनी 'आनंदी गोपाळ' हा सिनेमा आख्खे थिएटर बुक करून पाहिला. या साठी 'सिटी प्राईड, अभिरूची'च्या श्री. चाफळकरांनी मदत केली.

**❋ नियोजन-निवेदन बैठका :** या वर्षी निर्णय कर्त्यांच्या एकूण २९ बैठकांमधून विभागाचे काम चालू होते. दरमहा त्यापैकी साधारण २२-२३ बैठकी तरी होत होत्या. सगळ्या बैठकीं मध्ये मिळून ८२ गावातून ११० जणी सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी आंबवणे केंद्राची नवदिशा तर वेल्हे केंद्राची नवचेतना बैठक या गाव प्रतिनिधींच्या घडणीच्या प्रक्रियेसाठी महत्त्वाच्या ठरल्या.

**गाव पातळीवरच्या सहली**

| | ठिकाण | गावे | सहभागी महिला |
|---|---|---|---|
| १. नवदिशा | भीमाशंकर | १५ | ८२ |
| २. वेल्हा नवदिशा | हरळी, सोलापूर, अक्कलकोट, तुळजापूर | १२ | १९ |
| ३. मार्गासनी | भीमाशंकर | १ | १२ |
| ४. मालवली | हराळी, सोलापूर, पंढरपूर, तुळजापूर | २ | १० |
| ५. रांजे | भीमाशंकर | १ | १२ |
| ६. नवचेतना बैठक | हरेहरेश्वर | ६ | ११ |
| ७ कुंबळे सहल | देहू-आळंदी | १ | १७ |
| ८ नवचेतना | सोमनाथ | १५ | १७ |
| ९ गाऊडदरा | पंढरपूर, | १ | १२ |
| १० विविध गावे | बालाजी | ४ | ३० |
| ११ बोरवाडी | मढेघाट | २ | १२ |
| | | ५६ | २०४ |

**❋ नवदिशा बैठक :** नवदिशा बैठक आंबवणे केंद्रात दर महिन्याच्या १२ तारखेला घेण्यात येते. यावर्षी १२ बैठकी झाल्या. या बैठकीसाठी १८ गावातून २१ गाव प्रतिनिधी येत होत्या. त्यांनी आपापल्या गावाच्या कामाचे नियोजन या बैठकीत केले.

**❋ नवचेतना बैठक :** दर महिन्याच्या ४थ्या शनिवारी वेल्हे केंद्रात गाव प्रतिनिधींची नवचेतना बैठक घेण्यात येते. यावर्षी १२ बैठकी झाल्या. या बैठकीसाठी २० गावातून २४ गाव प्रतिनिधी येत होत्या. त्यांनी आपापल्या गावच्या कामाचे नियोजन बैठकीत केले. त्यात पासली खोऱ्यातील गटांची संख्या वाढवणे, आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्य विषयक जाणीव जागृती शिबिरे ठरवणे व घेणे. गाव पातळीवर नवरात्र मेळावे, तीळगुळ मेळावे घेणे असे कार्यक्रम ठरवले. त्यातून ज्ञान प्रबोधिनी करत असलेले काम गावापर्यंत पोहोचले.

**❋ वर्षारंभ समारंभ :** यंदा स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाचा वर्षारंभ समारंभ झाला. त्याला गणवेशात ६९ जणी उपस्थित होत्या. यामध्ये वार्षिक संकल्प म्हणून २२ बैठकींमध्ये गटांनी केलेली वार्षिक नियोजने एकेका प्रतिनिधींनें सगळयांपुढे मांडली. नंतर मा. कार्यवाह सुभाषराव देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.



**❋ तंबू शिबिर व प्रतिज्ञा ग्रहण :** दि. २४, २५ नोव्हेंबर २०१८ रोजी बोरावळे गावामध्ये महिलांचे तंबू शिबिर घेण्यात आले. नवदिशा बैठकीमधल्या कार्यकर्त्यांनी या शिबिराचे सर्व व्यवस्थापन केले. या शिबिरामध्ये एकूण १३० महिला सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी ७० महिला मुक्कामी राहिल्या होत्या. पहिल्या दिवशी विजया बँकेच्या दोन अधिकाऱ्यांनी स्वयंरोजगार या विषयावर प्रशिक्षण घेतले. दुसऱ्या सत्रात महिला आरोग्य या विषयावर डॉ शुभांगी कानिटकर यांचे सत्र झाले. संध्याकाळच्या सत्रामध्ये 'प्रबोधिनीपण' म्हणजे काय यावर गटचर्चा झाली. तर रात्री गट कार्य म्हणून गट पाडून विविध विषयावरची पथनाट्ये बसवली.

दुसऱ्या दिवशी प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये भारती खासबागे व आशा सुर्वे या दोन कार्यकर्त्यांनी तीन वर्षांसाठी पूर्णवेळ कामाची तृतीय प्रतिज्ञा घेतली. प्रबोधिनीचे काम करण्याची द्वितीय प्रतिज्ञा ६ कार्यकर्त्यांनी घेतली तर २९ जणींनी देशसेवा करण्याचे व्रत घेणारी प्रथम प्रतिज्ञा घेतली. **अशा एकूण ३७ जणींना संचालकांनी शिबिरामध्ये प्रतिज्ञा**

दिली. या प्रतिज्ञा ग्रहणाच्या तंबू शिबिराचे विशेष म्हणजे हे तंबू शिबिर स्थानिक महिलांनी नियोजन केलेलं होतं. त्याचा सर्व खर्च सुद्धा महिलांनी आपापला एकत्र येऊन केलेला होता.

*** नवनिर्वाचित सदस्य मेळावा :** वेल्हे पंचायत समिती अंतर्गत जी गावे येतात त्या पैकी काही गावांच्या निवडणुका झाल्या त्यात निवडून आलेल्या महिला नवनिर्वाचित सदस्य मेळावा घेतला. या मेळाव्यात २० सदस्य आल्या होत्या. ग्राम पंचायतीत काम करण्याचा बहुतेक जणींचा पहिलाच अनुभव होता त्यामुळे ग्राम पंचायतीच्या कामाची ढोबळ स्वरूपात माहिती सांगितली व विधायक विचार करायला लावणारे एक सत्र डॉ. वनितताई पटवर्धन यांनी घेतले.

## ⋆ एकल महिला ⋆

*** शासकीय योजनेचा लाभ :** एकल महिलांच्या कामाचे हे तिसरे वर्ष! या वर्षी ३ जणींसाठी शासकीय योजनेचा लाभ मिळण्यासाठी त्यांची नावनोंदणी प्रक्रिया पूर्ण केली. आता त्यांना दरमहा ६००/–रुपये मिळतील.

*** मेळावे :** मे २०१८ आणि जून २०१८ मध्ये एकल महिलांचे २ स्वतंत्र मेळावे घेतले. त्यामुळे या महिला संपर्कात आल्या. एकत्र आलेल्या महिलांनी त्यांच्या अडचणी काय आहेत, त्या कशा दूर करता येतील, यावर मोकळा संवाद साधला. जून २०१८ मध्ये वेल्हे तालुक्यातील ३० एकल महिलांचा मेळावा झाला. ज्यात सहभागींना छत्री आणि साड्यांचे वाटप करण्यात आले. आता थोड्याशा आधाराने काही जणी स्वतःच्या हिंमतीवर पुढे येऊन काम करताना, स्वयंपूर्ण आणि आत्मविश्वासपूर्ण बनताना दिसत आहेत. या संदर्भात महिला आयोगाच्या सोबत एकल महिलांच्या सर्वेक्षणाचा एक प्रकल्प केला त्याची सविस्तर माहिती स्वतंत्र लेखात पुढे दिली आहे.

*** दक्षता समिती :** वेल्हे तालुक्याच्या पोलिस स्टेशनला संलग्न असलेल्या दक्षता समिती सोबत आपण गेली काही वर्षे काम करत आहोत. कामाचा अनुभव गाठीशी असल्यामुळे या दक्षता समितीच्या सदस्य आणि अध्यक्ष, द्वारकाताई कौटुंबिक हिंसाचार प्रश्नांसंदर्भात काहीजणींना पोलीस स्थानकापर्यंत पोचण्याची गरज पडू देत नाहीत. कधी कधी मध्यस्थी करून स्वतः ग्राम पंचायत समितीच्या संरक्षण अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून सोडवत आहेत. एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ मध्ये तीन केसेसचे संसार या प्रकारे मार्गी लावल्याचे समाधान गटाला मिळाले. तीन जणींचे कोर्टामध्ये काम चालू आहे व दोन जणींचे चर्चेत आहे. केवळ दक्षता समितीच्या सदस्य राहून स्वाक्षरी पुरते काम असे मर्यादित न ठेवता आपले मत कुणाच्याही दबावाला बळी न पडता, खऱ्याला खरे आणि खोटयास खोटे म्हणण्याची ताकद व जबाबदारी या कार्यकर्त्यांकडे आली आहे. न्याय मिळण्यासाठी अपवादाने त्यांना पुणे कोर्टात साक्ष देण्याचे कामही प्रथमच करावे लागले.



## विविध प्रकल्प

*** कातकरी विकास उपक्रम :** २०१७ पासून सुरु केलेल्या कातकरी समाजाच्या कामाला आता चांगली गती आली आहे. वेल्ह्याच्या कोंढवली व मालवली या दोन वस्त्यांवर वर्षभर नियमित काम केले. वस्तीवर मुला–मुलींचे दल घेतले. दलावर येणाऱ्या मुलांनी शिक्षण प्रवाहात येण्यासाठी त्यांना आरोग्यदायी सवयी लागायला हव्यात. या सवयी म्हणजे रोज दात घासणे, तेल लाऊन वेणी घालणे अशा. या कामापासून व्यक्ती विकासाला सुरुवात केली. मुलांची बाल रोग तज्ज्ञांकडून आरोग्य तपासणी करून घेतली. ३५ मुला–मुलींची कातकरी हॉस्टेल बघायला सहल कान्हे फाटा येथे काढली. आपल्या प्रयत्नाने या वर्षी १३ जण नियमित शाळेत जायला लागले. एक जण पोलीस होण्यासाठी पुण्यात शिकायला आली. ११वी झालेली ही तालुक्यातील पहिली कातकरी मुलगी म्हणून तिचा सत्कारही झाला.

या उपक्रमात पालकांचा सहभाग फार महत्त्वाचा म्हणून आपण महिला पालकांच्या पाठिंब्यासाठी २ बचत गट वस्तीवर सुरु केले. काही कुटुंबे सावकारी कर्जात बुडाली होती त्यांना गटातून कर्ज दिले. गटातल्या महिलांची सहल पंढरपूर, अक्कलकोट अशा तीर्थक्षेत्रास नेली व त्यांना प्रबोधिनीच्या हराळी केंद्रातील विकास कामे दाखवली. धडपड करणाऱ्या महिलांना याचा मुख्य प्रवाहात येण्यासाठी खूप उपयोग झाला.

*** समाज अभ्यास :** वेल्ह्याच्या कातकरी समाजाचा अभ्यास करण्यासाठी तालुक्यातील ३६ वस्त्यांपैकी २३ वस्त्यांवर भेटी दिल्या. मुख्य म्हणजे या समाजासाठी काम करणारा युवतींचा एक गट आता तयार झाला आहे. कामाला नेमकी दिशा मिळावी म्हणून युवतींचे कातकरी अभ्यास सत्र झाले. या विषयातील तज्ज्ञ विंझर मधले सर महादेव डोंगरे – ज्यांनी या विषयात डॉक्टरेट केली आहे, त्यांनी या १७ युवतींना मार्गदर्शन केले. या नंतर शिक्षण, आरोग्य, आर्थिक जीवन, संस्कृती या चारही

विषयांवर १९० प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्याचे काम या गटाने पूर्ण केले. सध्या प्रश्नावली भरण्याचे काम सुरु आहे.

*** स्वावलंबी गाव :** या वर्षी 'स्वावलंबी गाव' असा नवीन प्रकल्प आस्कवडी, वडगाव झांजे, मालवली, कोंढवली, कुंबळे व लव्ही या ६ गावांसाठी केला. या गावांमध्ये जिथे बचत गट नव्हते तिथे बचत गट सुरु केले, स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण घेतले. आरोग्यासाठी डोळे तपासणी व कर्क रोग निदान शिबिरे प्रत्येक गावात घेतली, परसबागेसाठी बियांचे वाटप केले. त्याशिवाय महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक गावात पाणी शुद्ध करणारे विजे शिवाय चालणारे ५ फिल्टर वाटप केले. महिलांनी एकत्र येऊन गाव विकासाचे नियोजन करावे म्हणून बहुतेक गावांच्या सहली काढल्या व गाव स्वावलंबी होण्यासाठी गावात काय काय करावे अशी यादी तयार केली. त्यानुसार गावाच्या पुढाकाराने काही कामे सुरु केली आहेत.

*** टेलीमेडिसीन प्रकल्प :** रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड यांच्या आर्थिक मदतीने वेल्हे तालुक्यातील करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्रा सोबत टेलीमेडिसीन प्रकल्प सुरु केला. या प्रकल्पात शासननियुक्त 'आशा आरोग्य कार्यकर्त्यांनी' गाव पातळीवर आरोग्य तपासणी करणे अपेक्षित आहे. यामध्ये रक्तातील लोहाचे प्रमाण व साखर, रक्त दाब व शरीराचे तापमान अशा तपासण्या अत्याधुनिक उपकरणाच्या मदतीने करायच्या आहेत. त्यासाठी १२ निवडक आशांना आरोग्य तपासणी संच दिला. ज्यामध्ये टॅब सुद्धाआहे. टॅब व त्या सोबत आलेली ब्लू टूथ तंत्रज्ञानाने वापरायची उपकरणे कशी वापरावीत याचे आशा कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले. टॅबच्या मदतीने गाव पातळीवर आशांनी केलेल्या तपासणीची रीडिंग्ज करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्रावर बघण्याची सोय केली. हा प्रकल्प व्यवस्थित चालण्यासाठी आशा कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, मासिक निवेदन बैठक, मानधन वाटप याची जबाबदारी रोटरी क्लबने ज्ञान प्रबोधिनीवर सोपवली. ही जबाबदारी आपण व्यवस्थित पार पाडली. वर्षा अखेर पर्यंत ३८२ जणांची अशी तपासणी आशांनी केली. या तपासणीमुळे काही ज्येष्ठ नागरिकांना असणारा जास्त रक्त दाबाचा व प्रमाणा बाहेर वाढलेल्या रक्तातल्या साखरेचे प्रमाण लक्षात आले त्यामुळे तपासणी व वेळेत उपचार झाल्यामुळे त्यांचा जीव वाचला.

*** 'ओळख स्पर्शाची' कार्यशाळा :** 'ओळख स्पर्शाची' या नवीन विषयाच्या प्रशिक्षणाची कार्यशाळा ग्रामीण युवती व हिरकणी यांच्यासाठी पुण्यातील संवादिनी गटाने घेतली. ही कार्यशाळा दिवाळीच्या सुट्टीत झाली. हे प्रशिक्षण ४२ जणींनी

## बैठकीचे नाव व संख्या

| क्र. | बैठकीचे नाव | सभासद संख्या |
|---|---|---|
| १ | सहविचार बैठक | १० |
| २ | शिखर बैठक | ८ |
| ३ | विभाग प्रमुख बैठक | १६ |
| ४ | सुकाणू बैठक | २१ |
| ५ | नेतृत्व बैठक | १६ |
| ६ | स्वयंरोजगार बैठक शिखर बैठक | ६ |
| ७ | स्वयंरोजगार बैठक (वेल्हे) | ७ |
| ८ | स्वयंरोजगार बैठक (शिवापूर) | ८ |
| ९ | स्वयंरोजगार बैठक (आंबवणे) | १० |
| १० | आरोग्य बैठक | ८ |
| ११ | वेल्हे प्रबोधिका बैठक | ११ |
| १२ | नव दिशा बैठक | १९ |
| १३ | नव चेतना बैठक | १७ |
| १४ | हिरकणी बैठक | १३ |
| १५ | बालवाडी बैठक | ९ |
| १६ | नवचैतन्य दल बैठक | १९ |
| १७ | किशोरी विकास बैठक | १२ |
| १८ | युवती बैठक | ८ |
| १९ | युवती संघटन बैठक | ६ |
| २० | वेल्हे केंद्र बैठक | ७ |
| २१ | शिवापूर केंद्र बैठक | ६ |
| २२ | सहनिवास बैठक | ७ |
| २३ | आर्थिक बैठक | ३ |
| २४ | कातकरी प्रकल्प बैठक | ६ |
| २५ | एकल महिला बैठक | ४ |
| २६ | किशोर विकास बैठक | ९ |
| २७ | अर्थकारण बैठक | ३ |
| २८ | जीवनज्योती बैठक | २ |
| २९ | स्वयंरोजगार बैठक (जीवनज्योती) | ५ |

• **सुकाणू गट** हा पूर्णवेळ स्त्री शक्तीचे काम करणारा गट. त्या गटाने हे सगळे काम केले.

**त्या गटातील सहभागी सदस्य :** सुवर्णा गोखले, भारती खासबागे, आशा सुर्वे, भारती कामठे, अश्विनी ठाकर, तृप्ती कुलकर्णी, प्रतिभा स्वामी, रंजिता सरवदे, कुंदा खंडाळकर, सुरेखा दिघे, निर्मला कुंभार, शैला भोंडेकर, स्नेहा नित्सुरे, अनुराधा पुरोहित, स्वाती शिंदे, किर्ती कोंडे, दिपाली कामठे, गंगुताई सांगळे, हिरा जोर्वेकर, कावेरी शिवरकर, आशा गोगावले, लता प्रभुमिराशी, कल्याणी कोतकर, मृणाल बसाळे.

घेतले. यामध्ये पहिली ते सातवीच्या मुलांना चुकीच्या स्पर्शा बद्दल कसे सावध करावे या बद्दल रंजक खेळ–गोष्टीतून सांगितले. प्रशिक्षणा नंतर २४ जणींनी आपल्या भागातल्या १७ शाळांमधल्या १००० विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण ४५ दिवसात घेतले. या प्रकल्पासाठी रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन यांनी अर्थसहाय्य दिले. या निमिताने अशा अवघड विषयावर कसे बोलायचे असे प्रशिक्षक शिकल्या. लहान मुलींनी एरवी बाईंना किंवा आईला विचारले नव्हते असे अनेक प्रश्न विचारले.

## * जीवन ज्योती महिला सक्षमीकरण केंद्र

### * विशेष उपक्रम

**१. गरोदर महिला तपासणी :** जीवन ज्योती केंद्रामध्ये आपण दरमहा गरोदर महिला तपासणी योजली होती. वर्षभरात १२ वेळा तपासण्या झाल्या. यासाठी मागील १२ वर्षांपासून येणाऱ्या डॉ. वैशाली बिनीवाले व त्यांच्या सहकारी येत होत्या. पेशंट म्हणून महिन्याला ६५–७० जणी येत होत्या.

**२. अंगणवाडी ताई प्रशिक्षण** – शासकीय अंगणवाडी ताईंचे दरमहा क्षमता विकासाचे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षण कार्यक्रमाची सांगता महिला दिनाच्या निमित्ताने झाली. महिला दिनाचे औचित्य साधून 'माझी लेक भाग्यश्री' या विचारावर आधारित स्नेहसंमेलन झाले. महिलांच्या विश्वातल्या, माझी लेक/ सावित्रीबाई अशा विषयावर २१ कार्यक्रम बसवून अंगणवाडी ताईंनी सादरीकरण केले. त्यास १९२ जणी आल्या होत्या. अशा प्रकारचा हा कार्यक्रम संपूर्ण पुणे जिल्ह्यातला पहिलाच होता.

**३. कौशल्य ज्योती उत्पादन केंद्र :** या महिला केंद्रात जे स्वयंरोजगार प्रशिक्षण व उत्पादन होत होते ते 'कौशल्य ज्योती' बचत गटाद्वारे होत होते. हा गट स्थापन करणे, त्यात प्रशिक्षणे योजणे, महिलांना काम देणे, उत्पादनाची विक्री करणे अशी घडी बसवण्याचे काम आपण केले. वर्षभरात २५–३० जणींना काम दिले व ६ लाख रुपयांपेक्षा जास्त विक्री या गटाने केली.

**४. नियमित विद्यार्थिनींसाठी कार्यक्रम :** १. विविध तंत्र शिक्षण वर्गासाठी प्रवेश घेतलेल्या युवतींसाठी मैदानी खेळ घेण्यासाठी वर्षभर आठवड्यातून एकदा दल झाले. २. महिन्यातून किमान २ वेळा विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले जायचे, प्रवेशासाठी ॲडमिशन मेळाव्याचे आयोजनही केले. या साठी गावातील कार्यकर्तीने गाव पातळीवर प्रचार करणे असेही काम केले.

*** कै. लिलाताई तांबे शैक्षणिक संकुल :** मुलींचे शालेय शिक्षण चालू राहावे म्हणून आपण जास्वंद गिरीकन्या निवास बांधला व यशस्वी रीत्या चालवला. त्यामुळे मुलींच्या महाविद्यालयीन शिक्षणा संबंधी अडचणी काय येतात हे समजले. त्यातून युवतींच्या निवासाची गरज लक्षात आली. श्री चंद्रशेखर देसाई यांनी या प्रकल्पास देणगी दिली. त्यातून कै. लिलाताई तांबे शैक्षणिक संकुलाची कल्पना साकारली. काम वाढवायचे तर वेल्ह्यात असणारी जागा कमी पडेल म्हणून या प्रकल्पासाठी आपले वेल्ह्यातले हितचिंतक श्री आडकर यांची जागा ज्ञान प्रबोधिनीने खरेदी केली. येत्या वर्षात त्यावर वास्तू उभारून नविन कामाला सुरुवात होईल.

*** किशोर विकास :** किशोरी विकास उपक्रमा सोबत किशोर विकास उपक्रम करण्याची गरज वारंवार जाणवत होती. यंदा नियोजन करून स्थानिक युवकांच्या मदतीने ३ शाळांमध्ये किशोर विकास प्रकल्प राबवला. नियमित तासिका घेतल्या. या मुलांची पुण्यात सहल काढली. हा उपक्रम राबवणाऱ्या ११ युवकांचे पहिलेच प्रशिक्षण शिबिर सज्जन गडावर झाले. हे शिबिर निवासी होते. या शिबिराला पुण्याच्या युवक विभागातले कार्यकर्ते पूर्णवेळ उपस्थित होते.

*** तंत्रज्ञान परिचय :** या वर्षातली नवीन भर म्हणजे तंत्रज्ञान परिचय! या वर्षी मराठी विकिपीडियाची ओळख करून देणाऱ्या दोन कार्यशाळा घेतल्या. ५० महिलांची चरित्रे देवनागरीतून अपलोड केली. त्या शिवाय ८ मार्चला जागतिक महिला दिनाचे औचित्य राखून युनेस्कोने दिल्ली येथे कार्यशाळा आयोजित केली होती त्याला प्रशिक्षक म्हणून हे काम बघणाऱ्या कल्याणी कोतकर यांना जाण्याची संधी मिळाली. या विकिपीडिया कार्यशाळेला भारतभरातून ८७ जण आले होते.

## ⋆ विशेष भेटी ⋆

१ 'शब्द ते शक्ती' प्रकल्पाचे देणगीदार **श्री अनंत सेटलवाड** यांनी वर्षभरात २ वेळा पुणे कार्यालयाला भेट दिली. त्यांना प्रकल्पाच्या कामाचा आढावा सादर केला. त्यांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले. त्यातून स्वावलंबी गावाची कल्पना विकसित झाली.

२ अमेरिका स्थित **श्री सुभाष पुराणिक** यांनी 'राम–सीता पुराणिक तंत्र निकेतन' द्वारे चाललेल्या कामाचा आढावा घेणारी भेट, प्रबोधिनीच्या पुणे कार्यालयाला दिली व कामा प्रती समाधान व्यक्त केले.

३ देशातील अग्रगण्य संशोधन संस्था आयसर, पुणे या संस्थेच्या **डॉ. राव व डॉ. नातू** यांनी आपल्या कामाला भेट

दिली. वेल्ह्यातील लव्ही गावात एकत्र काही काम करता येईल का? याचीही पहाणी केली.

४ जास्वंद गिरीकन्या मुलींच्या सहनिवासास देणगी देणाऱ्या ना. ग. परांजपे प्रतिष्ठानच्या **नेहाताई व स्मिताताई** यांनी सहनिवासाला भेट दिली. मुलींशी गप्पा मारल्या व त्यांची प्रगती समजून घेतली.

५. **कॅडन्स कंपनीच्या व रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवन यांच्या प्रतिनिधींनी** नातू सभागृह सुशोभन करणारे रंगकाम करण्यास मदत केली.

६. **चंद्रशेखर देसाई व त्यांच्या स्नेह्यांची** वेल्हे केंद्रास भेट झाली, त्यातून कै. लीलाताई तांबे शैक्षणिक संकुल या नवीन प्रकल्पाला सुरुवात झाली. युवती सहनिवास व शैक्षणिक संकुलासाठी वेल्ह्यात जागा खरेदी झाली'

७. VAL संस्थेचे प्रतिनिधी म्हणून अजितराव कानिटकर हे त्यांच्या २ सहकाऱ्यां सोबत आले होते. मालवली व घिसर या गावात त्यांनी ज्येष्ठ नागरिकांचे काय प्रकारचे प्रश्न आहेत यावर चर्चा घेऊन प्रश्न समजून घेतले.

* दरवर्षी प्रमाणे यंदाही ग्लोबल अलायन्स संस्थेतून व डेक्कन कॉलेजच्या एका कोर्सचे परदेशी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे एकूण ३ गट/२६ विद्यार्थी आपले काम बघायला आले. त्यापैकी ६ जणांनी १०० तास आपल्याकडे कामही केले हे विशेष

## ★ स्फुट ★

३ ते १२ जानेवारी २०१९ या कालावधीत सावित्री  ते जिजाऊ जयंतीनिमित्त स्त्री शक्ती जागर केला. त्या निमित्ताने ११ कार्यक्रम योजले. त्यात सावित्रीबाईंचे चरित्र कथन, स्वच्छता मोहीम उपक्रम, जिजाऊ चरित्र कथन, किशोरी २० किलोमीटर सायकल फेरी अशा विविध कार्यक्रमांची योजना केली.

*** कामावर अभ्यास :**

१. या वर्षी महाराष्ट्र पातळीवर झालेल्या सेवा परिषदेत आपल्या कामावर आधारित आरोग्य विषयावर रंजिता सरवदे व किशोरी विकास उपक्रमावर अश्विनी ठाकर यांनी निबंध सादर केला.

२. नीती आयोगाने जुलै२०१८ मध्ये दिल्लीत घेतलेल्या 'एमपॉवरिंग वुमन : फॉस्टरिंग इंटरप्रेन्यूअरशिप, इनोव्हेशन अंड सस्टेनॅबिलीटी या अंतर राष्ट्रीय परिषदेत  ग्रामीण भागातल्या एकल महिलांच्या सर्वेक्षणावर आधारीत एक निबंध सादर केला. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. १६ देशाचे प्रतिनिधित्व या परिषदेमध्ये होते.

३. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या इ. १०वीच्या मुली ग्रामीण भागातला एखादा प्रश्न घेऊन त्याचा भविष्यवेधाच्या पद्धतीने अभ्यास करतात. यंदा अशा २ गटांनी अभ्यास केला. एका गटाने 'कौटुंबिक हिंसाचार' या विषयावर काम केले तर दुसऱ्या गटाने 'युवती शिक्षण' असा विषय अभ्यासाला घेतला होता.

४. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ ९वीतील मुले व मुली वेल्ह्याला जाऊन 'वेल्हे एक बाजारपेठ' असा अर्थशास्त्राच्या दृष्टीने अभ्यास करून आले. त्यांना बलुतेदार, वस्तू देऊन-वस्तू खरेदी अशाही व्यवहारांची माहिती मिळाली. हा अनुभव विद्यार्थ्यांना खूपच व्यवहारातले भान देणारा तरीही रंजक ठरला.

**५. हिरकणी :** हिरकणी प्रशिक्षणावरचा एक अभ्यास डॉ. वनिताताई पटवर्धन यांनी ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या मदतीने पूर्ण केला.

***** दर वर्षी प्रमाणेच यंदाही जेंडर बजेटवर पुण्यामधल्या वैकुंठ मेहेता को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट या संस्थेच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत सुवर्णा गोखले यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले. रिझर्व्ह बँकेच्या कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल बँकिंगच्या वतीने दर वर्षी सार्क देशातल्या बँक अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण घेतले जाते. त्यात आपले बचत गट, बँक जोडणी, आर्थिक साक्षरता या विषयीचे अनुभव सांगायचे हे सलग ५वे वर्ष आहे.

रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन याच्या सहकार्याने भागातल्या १० शाळांना पिण्याचे पाणी शुध्द करणारा फिल्टर बसवून देण्यात येणार आहे. त्या निमित्ताने शुध्द पाणी पिण्याचा आग्रह मुलांपर्यंत पोचेल.

*** कामावरील लेखन:** आपल्या भागातील कुरुंगवडी व शिवरे या २ गावाच्या महिला सरपंचांनी केलेल्या यशस्वी कारभाराबद्दल लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीत लेखन प्रसिध्द झाले.तसेच आपल्या बचत गटांच्या कामामुळे महिलांची जी आर्थिक साक्षरता होते त्या अनुभवावर आधारीत या वर्षी ॲग्रो वनमध्ये २२ लेख प्रसिद्ध झाले.

आपल्या कामाची माहिती आकाशवाणीच्या स्नेहबंध या कार्यक्रमातून दिली.

*** शैक्षणिक साहित्य वाटप :** दर वर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा सेवा सहयोग संस्थेतून १५० दप्तरे व शैक्षणिक साहित्याची मागणी केली होती. हे मिळालेले साहित्य ७ गावातील मान्यवरांच्या उपस्थितीत गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनीं पर्यंत पोचवले.

# एकल महिला

एकल महिला म्हणजे वेगवेगळ्या कारणाने एकटी रहाणारी महिला (अविवाहित, घटस्फोटित, विधवा, नवऱ्याने सोडलेली). महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या आर्थिक मदतीने आपल्या भागातल्या एकल महिलांचे सर्वेक्षण केले. या प्रकल्पासाठी ३ महिन्यात १० गावातल्या ५२ जणींचे तपशीलात सर्वेक्षण केले. या निमित्ताने अनेकींशी वैयक्तिक संवाद साधता आला. सर्वेक्षणात प्रामुख्याने लाभार्थी असूनही शासनाच्या 'एकल महिला' योजनेचा लाभ एकल महिला का घेत नाहीत याचा अभ्यास केला. या प्रकल्पाचा अहवाल शासनाला सादर केला.

या प्रकल्पाच्या सर्वेक्षणातून असे लक्षात आले की दुर्गम भागातील एकल महिलांची परिस्थिती तुलनेने जास्त बिकट आहे. प्रतिसाद देणाऱ्या बहुतेक जणी ३५-५० वयोगटातल्या होत्या. दुर्गमतेमुळे बहुतेक जणी फार शिकलेल्या नाहीत. शिक्षण कमी झाल्यामुळे उत्पन्नाच्या संधी खूप कमी आहेत, तसेच सुरक्षिततेच्या कारणामुळे तिला कमावण्यासाठी घराबाहेर पडायला जाऊन देत नाहीत. ६० % एकल महिलांना त्यांचे महिन्याचे किंवा वर्षाचे उत्पन्न किती हे माहित नाही. सर्वेक्षणात शासकीय मदत मिळवण्याविषयी माहिती घेतली असता असे लक्षात आले की, बहुतेक एकल महिलांना आपण एकल आहोत हे इतरांना कळूच नये असे वाटते, त्यात असुरक्षित वाटते. म्हणून मग अशा अनेक जणी शासकीय योजनेच्या लाभार्थी असल्या तरी कार्यालयात जातच नाहीत, शिक्षण नसल्यामुळे काहींना जायचा संकोच होतो. अर्ज भरता आला नाहीतर कोणीतरी ओरडेल अशी अनामिक भीतीही वाटते. सरकारी अधिकारी बहुतेक 'पुरुष' असल्यामुळे येणारे ताण वेगळेच असतात. अशा ५२ महिलांच्या घेतलेल्या मुलाखतींचा गोषवारा खाली देत आहे.

एकल महिलांपैकी ज्या परितक्त्या आहेत त्यापैकी अनेक जणी माहेरी राहतात. दहा-दहा वर्षे माहेरी राहूनही त्यांचे माहेरच्या रेशन कार्डवर नाव नसते म्हणजे त्यांचे त्या गावात कायदेशीर अस्तित्वच नसते. माहेरच्या गावात राहूनही म्हणजेच 'गावची नागरिक' असूनही ग्राम सेवक 'रहिवासी दाखला' देऊ शकत नाही. परिणामतः तिला माहेरच्या घरी आश्रिताचे जिणे जगावे लागते. शेवटी या पुढे काय करावे असे वाटते असे विचारले असता ज्यांना मुले आहेत त्यांनी काहीतरी उत्तर दिले. बाकीच्यांनी असा विचारही कधी केला नव्हता. मुलाखत घेताना वेगवेगळ्या प्रश्नातून एकल महिलेचा आयुष्या बद्दलचाच नकार ऐकू येत होता.

यातून मार्ग काढायचा असेल तर शासनाने सुद्धा खालील गोष्टींवर विचार करायला हवा असे वाटते.

१. एकल महिलांना मदत करणे हा विषय अंगणवाडी ताईचा केला तर गाव पातळीवर मदत मिळेल. ताईने एखादी महिला एकल झाली तर त्या महिलेची 'एकल' अशी नोंद करावी. योजनेची लाभार्थी होऊ शकत असेल तर पहिली मदत अंगणवाडी ताईने करावी.
२. एकल महिला किमान ७ वर्षे ज्या गावात रहात असेल तर त्या गावातील ग्राम सेवकाने एकल महिलेला रहिवासी दाखला द्यावा
३. बाई विधवा झाल्यावर ती 'कुटुंब प्रमुख' आहे असे स्वतंत्र रेशन कार्ड तहसीलदाराने तलाठ्या मार्फत मिळेल असे करावे, ज्यावर फक्त तिचे आणि असल्यास तिच्या मुलांची नावे असावीत. असे झाले तर योजनेसाठी लागणारी कागदपत्रे

**- शासकीय मदती विषयी उदासीनतेची कारणे -**

| | हो | नाही | उत्तर दिले नाही |
|---|---|---|---|
| १) सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात त्यासाठी खर्च येतो | २९ | १६ | ७ |
| २) सरकारी कार्यालयात पुरुष अधिकारी असतात म्हणून दडपण येते | २९ | १० | १३ |
| ३) शासकीय कार्यालयात कागदपत्र लागतात म्हणून काम होत नाही असे वाटते | ३६ | ७ | ९ |
| ४) एकटी आहे हे लोकांना कळेल असे वाटते | २६ | १६ | १० |
| ५) शिक्षण कमी आहे म्हणून अडचण येते असे वाटते | ३५ | ६ | ११ |
| ६) योजना माहीतच नाहीत | ३२ | १४ | ६ |
| ७) 'समाज माझ्याकडे कसा बघतो'... म्हणून नको वाटते | २३ | १९ | १० |

सहज उपलब्ध होतील.

४. एकल महिलांमध्ये वाईट परिस्थिती असते ती परित्यक्तांची! अनेकदा आपण 'एकल' आहोत असे त्या स्वतःच स्वीकारतच नाहीत. रीतसर घटस्फोट झाला नसेल तरी जर ती ७ वर्ष माहेरी रहात असेल तर तिचे एकटीचे स्वतंत्र रेशन कार्ड मिळावे व तिचे नाव जुन्या कार्ड वरून (सासरच्या कार्डावरून) तहसीलदारा कडून वगळले जावे त्यासाठी तिने नवीन कार्डसाठी अर्ज करणे एवढेच पुरेसे असावे. सासरच्या मंडळींशी यासाठी लढण्याची ताकद तिच्याकडे नसते हे समजून घ्यावे.

५. ८ मार्च च्या सुमारास जी ग्रामसभा होत असेल, त्या ग्रामसभेत एकल महिलांसाठी गावाने काय काम केले त्याची ग्रामसभेत रीतसर नोंद करण्याचे आदेश द्यावेत म्हणजे तरी निदान योजना महिलांपर्यंत पोचतील.

६. महिला बाल कल्याण विभागाकडून अंगणवाडी ताई यांच्या मदतीने अशा महिलांची वर्षातून एकदा यादी केली जावी. वर्षातून एकदा योजनेची माहिती देण्यासाठी किमान एकदा तालुका पातळीवर मेळावा घेतला जावा.

या विषयात आपण गेली ३ वर्षे काम असल्यामुळे काही एकल महिला संस्थेच्या वेगवेगळ्या प्रकल्पात आत्मविश्वासाने सहभागी झाल्या आहेत. केवळ त्यामुळेच गावागावातल्या एकल महिला शोधून असे सर्वेक्षण करणे शक्य झाले. मुलाखतीतल्या अनेक प्रश्नांची उत्तरे मोकळेपणाने दिली, विश्वासाने मनोगत व्यक्त केले. एकल महिलेच्या हातात रोख पैसे कधीच नसतात, त्यात कायम कष्टाचे जिणे! दिवसभर राबून सुद्धा स्वतःचे हक्काचे काही नाही, आत्मसन्मान मारून जगावे लागणे या बद्दल अनेक जणी बोलल्या. परितक्त्या असलेल्यांकडे कुठलीही कागदपत्रे नसतात. ना रेशन कार्ड, ना आधार, कधी कधी लग्न झाल्याचा पुरावाही नसतो... एखादीने पुढे शिकायचे ठरले तर शेवटची मार्क शीट मिळणे तर अशक्यच त्यामुळे शिक्षण बंद! माहिती घेणाऱ्या महिला त्याही विश्वासाच्या असल्यामुळे स्वतःच्या कहाण्या अनेकींनी डोळे ओलावले तरी निःसंकोच सांगितल्या.

एकेक व्यथा अशा होत्या की...मालक गेले पण रेशन कार्ड कुठे ठेवले माहित नाही..... म्हणून आज पर्यंत रेशन आणले नाही या प्रतिक्रिये पासून रोजच्या व्यापातून २-४ दिवस जाऊन राहावे असे एखादे माहेरा सारखे ठिकाण सुद्धा नाही.... एकूणात या व्यथा काही फार मोठ्ठ्या नव्हत्या पण माणूस म्हणून जगताना जाणवणारी कुचंबणा होती. या प्रत्येकीचा आत्मविश्वास वाढायला हवा... सर्वेक्षण करणाऱ्या प्रत्येकीला हे लक्षात आलं की आपण यांच्यासाठी काहीतरी केलं पाहिजे! ..... प्रकल्प संपला पण विषय मनातून जात नव्हता... आता हा विषय कामाचा भाग बनलाय. अमेरिकेतल्या नंदाताई काळे यांनी देणगी दिल्यामुळे मनाच्या मोकळीकीसाठी यांच्याकरता वेल्ह्यामध्ये माहेरघर उभं राहिलं आहे! थोड्या दिवसांसासाठी माहेर पणाला येण्यासाठी.

प्रकल्प हे केवळ निमित्त होतं, त्या नंतरही अशी एकल महिलांची माहिती आपण गोळा करतच आहोत. आजपर्यंत आपल्या भागातल्या अशा जवळ जवळ ३०० पेक्षा जास्त एकल महिलांची माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे.

---

विशेष लेख २

## बचतगटाच्या माध्यमातून होणारे महिलांचे व्यक्तिमत्त्व विकसन आणि नेतृत्त्वविकसन...

वंदना कामठे

या सेवा सहयोग या संस्थेने Women In Sewa अशी महाराष्ट्र व्यापी परिषद घेतली त्यात सादर केलेल्या पेपरचा काही भाग

ज्ञान प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाने घेतल्या जाणाऱ्या बचत गटात येणाऱ्या महिला केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात असे अपेक्षित नाही तर या माध्यमातून महिलांनी आत्मनिर्भर व्हावे, स्वतःच्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय स्वतः घ्यायला शिकावे असे अपेक्षित आहे. केवळ स्वतःचा विकास करण्यापुरते या महिलांनी मर्यादित न राहता आपल्या कुटुंबांच्या, गावाच्या, समाजाच्या म्हणजेच पर्यायाने आपल्या देशाच्या विकासासाठीही आपले योगदान द्यावे अशी प्रबोधिनीची या कामामागील भूमिका आहे.

पुणे जिल्ह्यातील हवेली, भोर व वेल्हे तालुक्यातील ४० गावांमध्ये प्रबोधिनीचे ३०० बचतगट आहेत. इतर बचतगटांप्रमाणेच गावात बचतगटाची स्थापना होणे, दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करण्यासाठी एक बैठक घेणे, बँकेत खाते उघडणे, जमलेल्या रकमेतून गटातील महिलांच्या गरजेनुसार कर्जवाटप करणे, कर्ज व व्याज वसुली, कर्जाच्या रकमेतून छोटा-मोठा व्यवसाय सुरू करणे इ. प्रक्रियेतून ज्ञान प्रबोधिनीच्या बचतगटांचाही प्रवास होतो. परंतु या बचत गटात सहभागी झाल्यामुळे महिलांना आर्थिक बचती व्यतिरिक्त काय फायदा होतो, घरात, गावात निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग वाढतो का हे समजून घेण्याचा एका अभ्यासद्वारे प्रयत्न केला.

ज्ञान प्रबोधिनीच्या बचतगटातील महिला आज ग्रामपंचायत सदस्य, पोलीस दक्षता समितीच्या सदस्य म्हणून

तसेच गावाच्या विकासात पुढाकार घेऊन काम करताना दिसतात. त्यांच्यामध्ये एवढा आत्मविश्वास, निर्णय घेण्याची क्षमता कुठून येते हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला असता आढळून आले की बचतगटाच्या आर्थिक कामाव्यतिरिक्त महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्यातील नेतृत्वगुण वाढीस लागावे यासाठी जे उपक्रम घेतले जातात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

अशा तीन उपक्रमांचे आयोजन या महिलांसाठी केले जाते की ज्यामध्ये सहभागी झाल्यावर महिलांना आपल्या घरांतून बाहेर पडण्याची, बाहेरचे जग पाहण्याची, नवीन गोष्टी पाहण्याची संधी मिळते. या उपक्रमामध्ये सहभागी झाल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो व स्वतः सक्षम होण्याच्या दिशेने त्यांचे पहिले पाऊल पडते.

हे उपक्रम पुढीलप्रमाणे -

**१) अभ्यासदौरे व सहल :** जेव्हा महिला बचतगटाच्या सदस्य होतात तेव्हा प्रथम एखाद्या धार्मिक स्थळी अथवा प्रसिद्ध ठिकाणी त्यांची सहल काढण्यात येते. अशा सहलींमुळे त्या घराबाहेर पडून, कुटुंबियांशिवाय एकटीने प्रवास करण्याचा अनुभव घेतात, इतर महिलांमध्ये मिसळतात, नवीन मैत्रिणी त्यांना मिळतात, त्यांच्याशी आपल्या मनातल्या गोष्टी मोकळेप्रमाणे त्या बोलू शकतात.

अशा छोट्या सहलींचा अनुभव घेतलेल्या महिला त्यानंतर अभ्यासदौऱ्यां मध्ये सहभागी होतात, जेथे आपल्या देशातील विविध राज्यांना भेट देऊन तेथील सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थिती समजून घेण्याचा त्या प्रयत्न करतात. आतापर्यंत दिल्ली, अरुणाचल प्रदेश, गुजराथ इ. ठिकाणी या महिलांनी भेट दिली आहे.

**२) शिबिरे :** २/३ दिवसांच्या या निवासी शिबिरांमध्ये प्रामुख्याने महिलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध सत्रे घेतली जातात. अशा प्रकारे आपल्या घरापासून दूर आपल्या मैत्रिणींमध्ये राहतात. एक आपुलकीचं नातं त्यांच्यात निर्माण होतं. या महिलांना एक प्रकारचा आधार मिळतो की उद्या त्यांच्यापैकी एखादीच्या बाबतीत काही विपरीत घडलं तर इतर सगळ्याजणी तिच्या पाठीशी उभ्या राहतील.

**३) मेळावे :** मकर संक्रांत, नवरात्र अशा निमित्ताने महिलांसाठी मेळाव्यांचे आयोजन केले जाते. बचतगटात बराच काळापासून येणाऱ्या महिला आपल्या गावातून बाहेर पडून नवीन गावात जाऊन तेथील महिलांसाठी अशा मेळाव्यांचे आयोजन करतात, बचत गटाची माहिती सांगतात.

ज्ञान प्रबोधिनीच्या आपल्या बचतगटांना केवळ आर्थिक उपक्रमापुरते मर्यादित ठेऊ इच्छित नाही तर या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासाचे काम करू इच्छिते. ज्ञान प्रबोधिनी असे मानते की प्रत्येक महिलेमध्ये स्वतःची प्रगती करण्याची क्षमता आहेच, त्यांना गरज आहे योग्य प्रशिक्षणाची, शिक्षणाची. एकदा का त्यांना अशी संधी मिळाली की त्यांना पुढे जाण्यापासून कोणी थांबवू शकत नाही. अशा प्रगत महिलाच पुढे जाऊन समाजाच्या, देशाच्या विकासकामात हातभार लावतील असा प्रबोधिनीचा दृढ विश्वास आहे.

या उपक्रमांमध्ये ज्या महिला सहभागी होतात त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेले बदल आपल्याला सहज ओळखू येतात. ज्या महिला केवळ आर्थिक उपक्रम म्हणून या बचतगटाकडे पाहतात, त्यांच्यामध्ये असे व्यक्तिमत्त्वातील सकारात्मक बदल अभावानेच आढळतात. त्यामुळे अशा कार्यक्रमांची उपयुक्तता किती आहे, हे आपल्याला कळते.

• **आपल्या आरोग्याच्या कामाचे महत्त्व** - डॉ. शुभांगी कानिटकर गावोगावी जाऊन कॅन्सरबद्दल माहिती देऊन तपासणी करतात. त्यापूर्वी रंजितताई त्या गावात आधी जाऊन महिलांच्या आरोग्याची माहिती देणारे फॉर्म भरतात. असेच अनेकदा लक्षात येते की काही खाजगी आजारांबद्दल खूप त्रास होत असला तरी महिला बोलत नाहीत. अंगावरच काढतात. 'पुरुष' डॉक्टरांशी बोलायचा संकोच येतो नि 'काही' निघाले तर ...? उपचारासाठी पैसे कुठून आणायचे याचेही दडपण असते. आश्वासकं सोबत तर ग्रामीण महिलेला कधी मिळतच नाही!

डॉ. कानिटकर अनुभवी ज्येष्ठ महिला डॉक्टर गावात गेल्या की त्यांच्याशी पेशंट मोकळेपणाने बोलतात. दीनानाथमध्ये कमी उत्पन्न असणाऱ्या रुग्णांना मोफत उपचार होतात. हे सगळे करताना 'आपली' वाटणारी कोणीतरी 'ताई' रक्ताच्या नात्याची नसली तरी कायम सोबत असते म्हणूनच केवळ अनेकजणी उपचाराला तयार होतात. केवळ महिलाच असणाऱ्या या रचनेमुळे अनेकींना जीवघेण्या आजारातून आपण वाचवू शकलो आहोत.....

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : **ज्ञान प्रबोधिनी : स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण),**

५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : ०२० २४२०७१६२/१३३

★ **शिवापूर** : खेड-शिवापूर वाडा, ता. हवेली, जिल्हा पुणे, ४१२२०५

★ **आंबवणे** : मातृछाया, ता. वेल्हे, जि. पुणे ★ **वेल्हे** : पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जि. पुणे